Jan – Feb – Mar 1953

रामनवमी विशेषांक

श्रीसाईबाबा संस्थान, शिरडी, या संस्थेने चालविलेलें

# श्री साई लीला त्रैमासिक

संपादक

श्री. नागेश आत्माराम सावंत

व्यवस्थापक

श्री. रामचंद्र महादेव राणे

साहाय्यक मंडळ

श्री. वसंतराव नारायण गोरक्षकर

श्री. गोपाळ वामन भागवत, एम्. ए.

श्री. बाळकृष्ण सखाराम पातार्डे

श्री. कृष्णराव जयराम [illegible]

वार्षिक वर्गणी
रु. २-४-० (ट. ख. स.)

किरकोळ अंक
दहा आणे

# अनुक्रमणिका


| अ. नं. | विषय | लेखकांचें नांव | पृष्ठांक |
|---|---|---|---|
| १ | प्रिय वाचक | संपादक | ५ |
| २ | बाबांची लीला | आमचे प्रतिनिधि | १० |
| ३ | रामनवमी | जिज्ञासु | २१ |
| ४ | साईबाबांचें भक्त | रंगू आत्माराम चाळकर | २७ |
| ५ | भक्ति | विद्वद्रत्न डॉ. रामचंद्र प्रल्हाद पारनेरकर, पीएच्. डी., जव्हेरी | ३० |
| ६ | साक्षात्कार | डॉ. रामराव मंगळूर | ३५ |
| ७ | एक उद्बो... वण | आमच्या प्रतिनिधिकडून | ३६ |
| ८ | हृदय | ना. वा. गुणाजी | ३८ |
| ९ | लोभी ब्राह्मणांचें गर्वहरण | आमचे प्रतिनिधि | ४१ |
| १० | ध्यानाचा ... स | पुरुषोत्तम मराठे | ४४ |
| ११ | आरती | ...गाधर रामचंद्र भट | ५१ |
| १२ | अतींद्रिय संशोधन | द. पां. खांबेटे | ५२ |
| १३ | श्रीबाबांची द्वारकामाई | एक जुना भक्त | ५९ |
| १४ | कृतज्ञतानंदोद्गार | विष्णुदत्त महाराज | ६५ |
| १५ | Shri sai and bhakti | Dr. V. V. Rao | ६६ |
| १६ | साईबाबा खरोखर कोण होते ? | | ६९ |
| १७ | शिरडीवृत्त | | ७४ |

# श्री साई लीला



॥ श्रीसाईनाथसमर्थ ॥

करितां माझिया कथांचें श्रवण । तयांचें कीर्तन आणि चिंतन ।
होईल मद्भक्तीचें जनन । अविद्या निरसन रोकडें ॥ २ ॥ ८२ ॥
शिवाय जे साई कीर्ति गाती । तैसेच जे जे सद्भावें परिसती ।
उभयही साई स्वरूप होती । हें दृढ चित्तीं जाणावें ॥ ४४ ॥ १८२ ॥

( श्रीसाई सच्चरित )

## प्रिय वाचक—

गेलीं चारपांच वर्षें श्रीसाईलीला त्रैमासिकाच्या संपादनाची अवघड जबाबदारी डॉ. के. श्री. गव्हाणकर यांनीं उत्कृष्ट रीतीनें संभाळली होती. या वर्षी चालू मार्चच्या अंकापासून हें कार्य मी माझ्या शिरावर घेत आहें. वस्तुतः 'कीं टिटिभू चांचुवरी । माप सूये सागरीं । मी नेणत त्यापरी । प्रवर्तें येथ ॥' अशी माझी स्थिति आहे. परंतु वाचकांची सहानुभूति आणि बाबांची कृपा या दोहोंच्या साहाय्यानें मी माझ्या अंगिकृत कार्यांत यश मिळवीन अशी माझी दृढभावना आहे. एखादा उत्कृष्ट गवई गाणें म्हणून बैठकींतून उठल्यानंतर त्याच जागीं एखाद्या सामान्य गायकानें गाणें म्हणण्यास प्रारंभ केला तर प्रेक्षकांचा गानसमाधिभंग केल्यासारखें झाल्याखेरीज कसें राहील ? तशी स्थिति तर माझ्या बाबतींत होणार नाहीं ना अशी सारखी धाकधूक मला लागून राहिली आहे. डॉ. गव्हाणकर यांच्या प्रतापी हातांनीं पेललेली जबाबदारी माझ्या हातांना कितपत सहन करवेल असें मनांत येतें. परंतु त्याबरोबरच हाहि

विचार मनांत येतो कीं 'मूकं करोति वाचालं, पंगुं लंघयते गिरिम्' असें त्याचें सामर्थ्य त्या श्रीसाईबाबांच्या चरणांचा मी दास असल्यावर मला भय कशाचें ? मी हें कार्य हातीं घ्यावें अशी बाबांची इच्छा नसती तर ही जबाबदारी माझ्यावर कां येती ? आणि जर त्यांच्या इच्छेनेंच हें कार्य माझ्याकडे आलें आहे तर आपल्या इच्छेनेंच तें अधिकाधिक यशस्वी केल्याखेरीज ते कसे राहतील ?

× × ×

श्रीसाईलीला हें त्रैमासिक प्रामुख्यानें बाबांचें माहात्म्य वर्णन करणारें, त्यांचें चरित्र गाणारें, त्यांचें तत्त्वज्ञान सांगणारें असें असलें तरी त्याला इतर धार्मिक, नैतिक वा तत्त्वज्ञानात्मक अशा विषयांचें वावडें आहे असें नाहीं, हें आजवरच्या साईलीलेच्या स्वरूपावरून वाचकांच्या ध्यानीं आलेंच असेल. साईबाबा हे स्वतः कोणत्याहि विशिष्ट पंथाचे तर नव्हतेच पण कोणत्या धर्माचाहि हक्क त्यांच्यावर सांगतां येण्यासारखा नव्हता. अलीकडेच काय परंतु पूर्वीहि झालेल्या अवतारांत इतकी जाति–पंथ–धर्मनिर्विशेष सर्वसंग्राहकता क्वचितच आढळेल. अशा सर्वोदार आणि सर्वसमावेशक विभूतीचें प्रतीक असलेल्या श्रीसाईलीलेंतहि हीच सर्वसमावेशकता, त्यांत येणाऱ्या साहित्याच्या बाबतींत आणावी असा माझा हेतु आहे. साईभक्तांना प्रिय व सर्वसामान्य धार्मिक दृष्टीच्या माणसांना वाचनीय असें हें त्रैमासिक व्हावें ही मनीषा आहे. साईलीला वाचून साईभक्तांची भक्ति अधिक उत्कट व्हावी आणि साईभक्त नसलेल्या वाचकांचेंहि मन साईबाबांकडे ओढलें जावें असें स्वरूप या त्रैमासिकाला देण्याचा आटोकाट प्रयत्न करण्याचें माझ्या मनांत आहे. यासाठीं ज्ञान, कर्म, भक्ति व योग या विषयांवर अधिकारी व अभ्यासू लेखकांचे लेख मिळविण्याची खटपट चालविली आहे. चालू अंकांतच विद्वद्रत्न डॉ. पारनेरकर महाराज व श्री. ना. बा. गुणाजी यांच्या लेखांकडे मी या दृष्टीनें वाचकांचें लक्ष वेधूं इच्छितों. साईलीलेच्या वाचकाला आपल्या इकडच्या धर्मजिज्ञासेप्रमाणेंच परकीय देशांतहि धर्मजिज्ञासेचें स्वरूप काय आहे हें समजावें, तिकडील साधुसंतांची माहिती व्हावी या दृष्टीनेंहि कांहीं लेख व्यासंगी लेखकांकडून लिहवून घेण्याचा विचार आहे. या अंकांतील 'पाश्चात्य देशांतील अतींद्रिय ज्ञानाचें संशोधन' याबाबतची माहिती वाचकांना बोधप्रद व मनोरंजक वाटेल असा विश्वास वाटतो.

× × ×

येवलें येथील कांहीं साईभक्तांकडून एक पत्र 'श्रीसाईलीलेकडे' आलें आहे. गेल्या महिन्यांत जैनगुरु श्रीजती गणेशमल महाराज हे येवल्यास आलेले होते. तेथील आपल्या मुक्कामांत त्यांनीं श्रीसाईबाबांविषयीं अधिक्षेपाचे उद्‌गार काढले अशी या साईभक्तांची तक्रार आहे, आणि या घटनेची दखल घेऊन साईलीलेनें यांबाबत कांहीं लिहावें अशी त्यांची अपेक्षा आहे. मला याविषयीं असें म्हणावेसें वाटतें कीं अशी जेव्हां टीका होते त्यावेळीं त्या टीकेची उपेक्षा करणें हेंच तिला उत्तम उत्तर होय. सयुक्तिक आधारांनीं एखाद्या माणसाचें समाधान करणें शक्य दिसेल त्यावेळीं

तें अवश्य करावें. परंतु एखाद्या विभूतीबद्दलचा एखाद्या मोठ्या माणसाच्याहि मनांत असलेला दुराग्रह सर्वथा काढून टाकणें हें अशक्यप्राय असतें. अशा स्थितींत त्याचें समाधान करण्याच्या भरीला पडून स्वतःचें मन कां विचलित होऊं द्यावें ? भगवान् श्रीकृष्ण हे पूर्णावतार होते. तरीहि शिशुपालानें भरसभेंत त्यांची कमी निर्भर्त्सना केली काय ? श्रीरामकृष्ण परमहंसांचें सबंध जीवनचरित्र त्यांच्या निकट सहवासांत राहून पाहाणाऱ्या आणि एका काळीं त्यांची असीम निष्ठेनें सेवा करणाऱ्या त्यांच्या-भाच्यानें-हृदयनें-अखेरीस त्यांच्याविषयींच्या आपल्या अधिक्षेप-वृत्तीनें स्वतःचेंच अकल्याण करून घेतलें नाहीं काय ? अवतारी पुरुषांना यथार्थपणें ओळखण्यास ओळखणाऱ्याच्या अंगीं तितका अधिकार असावा लागतो अथवा भक्ति असावी लागते. हीं नसतील तर अवतारी पुरुषाची ओळख पटणें अशक्यप्रायच असतें. ज्यांना आपण परमदैवत मानतों त्यांचा कोणाकडून अधिक्षेप होत असल्यास अत्यंत दुःख होणें हें स्वाभाविकच आहे. परंतु तरीहि त्या टीकाकाराविषयीं आपल्या मनांत दुर्विकल्प न ठेवतां त्याच्याविषयीं सकरुण आणि उदासीन वृत्ति ठेवावी हेंच माझ्या मतें योग्य ठरेल. येवल्याच्या साईभक्तांनीं पाठविलेल्या पत्रांत त्यांनीं श्रीजतींच्या उद्गारांबद्दल खेद व्यक्त केला असला तरी श्रीजतींविषयीं अत्यंत आदरानेंच त्यांनीं लिहिलें आहे, हें खरोखरच अभिनंदनीय आहे.

श्री साईबाबांवर होणाऱ्या टीकेसंबंधीं आपला दृष्टिकोण कसा असावा, या प्रश्नावर मला असें वाटतें कीं—(१) जिथें अज्ञानानें टीका झालेली दिसते तिथें तें अज्ञान नाहींसें करण्याचा यत्न करावा; (२) जिथें दूषित पूर्वग्रहानें टीका होते तिथें तो ग्रह काढून टाकण्याचा साधार प्रयत्न करावा; पण (३) जिथें केवळ अकारणविद्वेषानें टीका होते तिथें उपेक्षावृत्ति धारण करावी. अंतीं श्री साईबाबांवरील टीकेचा निरास हा आपल्या दुबळ्या प्रयत्नांनीं होणार नसून बाबांची जशी इच्छा असेल त्याप्रमाणेंच होणार आहे, ही भक्तांनीं खूणगांठ बांधून ठेवावी.

× × ×

श्रीसाईबाबा हे जन्मानें कोण होते यासंबंधीं बराच वाद अलीकडे माजलेला आहे. साईलीलेच्या गेल्या अंकांत श्री. नागेश वासुदेव गुणाजी यांचा एक लेख प्रसिद्ध झालेला असून त्यांनीं 'विधित-कान आणि सुंता-अभाव या दोन मुख्य गोष्टींवरून बाबा हिंदु ब्राह्मण होते असें ठरतें' असा अभिप्राय व्यक्त केला आहे. मद्रासमध्यें प्रसिद्ध होणाऱ्या साईसुधा या नियतकालिकांत, बाबांची सुंता झाली होती हें दाखविणारीं कांहीं प्रमाणें उद्धृत केलीं आहेत. तसेंच "साईबाबा हे १८५८ सालीं एका गुजराती ब्राह्मण कुटुंबांत जन्मास आले, त्यांना एका फकिराची गांठ पडली, तो त्यांना मक्केच्या यात्रेला घेऊन गेला होता' इ. इ. हकीकतींनीं भरलेलें राजर्षि बाल्लेन्यांसी यांचें एक 'साईचरित्रहि' साईसुधेंत आलेलें होतें. त्याविषयीं शिर्डी संस्थानने केलेला पत्रव्यवहार इतरत्र दिला आहे. तो वाचकांना मनोरंजक वाटेल. साईबाबांच्या चरित्रांतील या असल्या घटना शोधून काढणें हें इतिहाससंशोधकांनीं वाटल्यास करावें. श्रीसाईबाबा हे हिंदु होते कीं मुसलमान, ब्राह्मण कीं शूद्र, असंख्यासारख्या प्रश्नांचा कोणताहि निकाल लागला तरी

साईबाबांच्या अंगभूत श्रेष्ठत्वाला अधिक उजाळा मिळणार नाहीं किंवा काळिमा येणार नाहीं; तें श्रेष्ठत्व अखंड आजच्यासारखेंच उज्ज्वल राहील.

ज्यांना साईबाबांची कृपा संपादन करून घ्यायची आहे, त्यांची उपदेशवाणी अंतरंगांत सांठवून घ्यायची आहे आणि आपल्या जीविताचें सार्थक करून घ्यायचें आहे त्यांनीं असल्या वादांपासून दोन हात दूर रहावें हेंच उत्तम. खुद्द साईबाबांनीं आपली जन्मकथा कधीं कुणाला सांगितली नाहीं. ' माया ही माता आणि ब्रह्म हा पिता ' हीच साईबाबांची यथार्थ जन्मकथा. इतक्या विशाल चरित्राच्या या विभूतीला कोणता तरी धर्म, कोणती तरी जात ही देऊन त्यांच्या सर्वव्यापी जीवनाला संकुचित चौकटींत बसविण्याचा अट्टाहास करणाऱ्या लोकांकडे पाहून मला हंसू येतें, आणि कींवहि वाटते. हंसू अशासाटीं येतें कीं, सुईच्या नेढ्यांतून हत्ती नेणें हें जितकें अशक्य तितकेंच जाति-धर्म-पंथ-निरपेक्ष अशा साईबाबांना कुटल्या तरी संकुचित मर्यादेंत कोंडणें हें अशक्य आहे हें या लोकांच्या लक्षांत कसें येत नाहीं ? कींव अशासाठीं वाटते कीं, साईबाबासारखा कल्पवृक्ष लाधलेला असतांना त्याच्या छायेंत आपला जन्मोजन्मींचा संसारताप नाहींसा करून घ्यायचा सोडून, हे लोक तर्कांच्या रखरखीत उन्हांत उभे राहातात आणि कल्पवृक्षाच्या फांद्या किती व त्याला पानें किती याची निष्फळ चर्चा करीत बसतात! साईभक्तांनीं असले वाद फार तर


आपण सारे भाऊ भाऊ—

श्री बाबांचे ठिकाणीं भेदभाव नाहीं. उच्च-नीच, वरिष्ठ-कनिष्ठ ही भावनाहि नाहीं. सर्वांचा दर्जा एक. जणूं सारे भाऊ भाऊच !

अशींच गोष्ट आमच्या टोपीचीहि आहे. कोणीहि उच्च--नीच, वरिष्ठ--कनिष्ठ आपल्या आवडीची सुबक ' टोपी ' वापरून स्वत:च्या ठिकाणची एकीची भावना जागृत ठेवूं शकतो.

अशा सुंदर-सुबक-टिकाऊ

टोप्या

मिळण्याचें आदर्श ठिकाण—

भाऊ मोरोबा ढगे

ठाकुरद्वार रोड, मुंबई २

दुरून गंमतीनें पहावे; त्यांत स्वतः पडूं नये. बाबांचें अगम्य चरित्र त्यांच्या ह्य
कोणाला उलगडलें नाहीं. आतां तें गेल्याला पस्तीसएक वर्षे होऊन गेल्यावर त्
जीवनाचा थांगपत्ता लावण्यास समर्थ असा मायेचा पूत कोणी असेल हें सर्वथा
भवनीय आहे. आणि ही माहिती हवी तरी कशाला? भांडणें निर्माण करायला?
बाबांची पूजा हिंदूप्रमाणेंच अहिंदू करतो, ब्राह्मणाप्रमाणेंच अब्राह्मण करतो,
सर्वजण त्यांच्याकडे हा आपला म्हणून पाहतात. वस्तुतः जातीयतावाद संपूर्णप्रणें ना
झाल्याचें एकमेव आदर्श उदाहरण कुठें पाहायचें असेल तर तें बाबांच्या चरित्रांत.
संग्राह्क ईश्वरभक्तीचें अजोड उदाहरण असें लाधलेलें असतांना बाबांना एखाद्या वि
जातींत कोंवण्याची कां ही अपेशी खटपट? लोखंडाला सोनें बनविणारा परिस मिळ
असतांना, तो परीस नसून चटणी वाटण्याचा पाटा आहे असें ठरविण्याची ही यात
कसली द्योतक म्हणावी? छे छे! बाबांच्या नामजपांत व त्यांच्या गुणगानांत
होऊन भक्तिरसांत डुंबण्याचें सोडून हें तुषकंडन कोणीं करावें!

× × ×

इहामुत्रीं जो बाणला विरक्ती। विवेक वैराग्य जयाची संपत्ति।
काय तयाची पहाणें जाती। परमार्थ प्राप्ति धिक् तयाची॥ ८३॥
धर्माधर्मातीत स्थिति। जयाची शुद्ध आनंद वृत्ति।
काय तयाची पहाणें जाती। परमार्थ प्राप्ति धिक् तयाची॥ ९४॥

साईसच्चरित, अ. ३८

× × ×

श्रीसाईलीला हें त्रैमासिक मासिक या स्वरूपांत काढण्याचा आमचा मनोदय पू
साईलीलेंतून जाहीर झालेलाच आहे. तें केव्हां घडून येईल हें कसें सांग
श्रीसाईबाबांची इच्छा असेल तर तें यंदांच घडेल. त्यांची इच्छा नसल्यास आमचा भर
प्रयत्नहि विफलच ठरेल. पण बाबांची इच्छा होती परंतु आमचा उदंड प्रयत्न न
असा अपवाद येऊं न देण्याची मात्र आम्ही कळकळीनें कोशीस करूं असें मी निश्चि
आश्वासन देतों. माझ्यावर पडलेलें हें काम बाबांचें सदैव स्मरण करीत मी यथा
अधिकांत अधिक उत्कृष्ट बजावण्याचा प्रयत्न करीन. अखेरीस बाबांना आणि बा
वृंदांना माझी प्रार्थना एवढीच कीं,

तरी न्यून तें पुरतें। अधिक तें सरतें।
करुनि घेयावें हें तुमतें। विनवित असें॥

ॐ श्रीसाईसमर्थ

—संपादक




संकलक—आमचे प्रतिनिधी

## १ भूत बाधा नाहींशी झाली

**श्री.** बाबासाहेब सखाराम बावळे हे कोपरगांव तालुक्यांतील सुरेगांवचे राहणारे असून यांचें सुमारें सहा महिन्यांपूर्वींच लग्न झालें. परंतु लग्नानंतर अवघ्या ३ महिन्यांत यांचें कुटुंब सौ. सुशिलाबाई ह्या आजारी पडल्या. त्या वारंवार बेशुद्ध पडत व त्या अवस्थेंत असतांना घट्ट दांत मिटवून घेत. त्यामुळें त्यांच्यां प्रकृती-विषयीं घरांतील मंडळीस चिंता वाटूं लागली. बरेंच औषधोपचार केले पण गुण नाहीं. डॉक्टरांनीं आजारीपणाचें निदान हिस्टेरिया केलें. पण त्यावर पुष्कळ पैसे खर्च करून व सर्व प्रकारचे डॉक्टरी इलाज करूनही कांहींच गुण येईना. आजूबाजूचे लोक कांहीं भूतबाधा असावी अशी शंका प्रदर्शित करूं लागले. पण नवरा-बायको दोघेंही सुशिक्षित असल्यामुळें त्यांचा भुताखेतावर विश्वासच नव्हता. परंतु दुखणें वाढतच चाललें व सौ. सुशिलाबाई यांची तब्येत दिवसेंदिवस जास्त खराब होत चालली. त्या आतां १८।१८ तास बेशुद्धावस्थेंत असत. शेवटीं ऑक्टोबर महिन्याच्या (१९५२) २३ व २४ तारखेस त्यांची तब्येत फारच गंभीर झाली तेव्हां, वडिलांचे सांगण्यावरून व दुसरा कांहीं इलाजच उरला नव्हता म्हणून श्री. बावळे यांनीं आपलें कुटुंबास शिर्डीस श्रीसाईनाथांचे दर्शनास ता. २५-१०-५२ रोजीं आणलें. बरोबर त्यांच्या आत्याबाई होत्या. ता. २५ व ता. २६ रोजीं सुशिलाबाईस श्रीसाईनाथांच्या समाधीचे दर्शनास आरतीचे वेळेस बळजबरीनेंच धरून नेण्यांत आलें. कारण त्या जवळ जवळ सारा दिवस बेशुद्धावस्थेंतच असत. आरती झाल्यानंतर त्यांना बळजबरीनें धरूनच समाधीस प्रदक्षिणा घालण्यास लावीत व नंतर तीर्थ व विभूतीही बळजबरीनेंच पाजण्यांत येई. थोडीशी विभूति अंगासही लावीत

ता. २६ रोजीं संध्याकाळची आरती संपतांच सौ. सुशिलाबाई ह्या एकाएकीं खालीं पडल्या. त्यावेळेस तेथें मुंबईचे श्री. बाळकृष्ण यशवंत प्रधान यां नांवाचे एक भक्त होते. त्यांच्या सूचनेवरून बाईवर बाबांचें तीर्थ व उदी सारखी शिंपडण्यांत आली आणि आश्चर्याची गोष्ट अशी कीं त्या बेशुद्धावस्थेंतच सुशिलाबाई थोड्याच वेळांत बोलूं लागल्या. तेव्हां श्री. प्रधान यांनीं कांहीं प्रश्न विचारले. कारण त्यांची खात्री



श्रीसाईंबाबा ( शिरडी )

झाली कीं, सौ. सुशिलाबाईस भुतानें पछाडलें आहे व तें भूत आतां बोलूं लागलें आहे. हा वेळपावेतों समाधि-मंदिरांत हें दृश्य पाहण्यास बरेच लोक जमले होते. सुशिलाबाईंनीं जीं उत्तरें दिलीं तीं अर्थातच तुटक होतीं व त्यांत सुसंगतपणा नव्हता. परंतु वाचकांचे सोईकरतां त्यांत सुसंगतपणा आणून ते प्रश्न व जीं उत्तरें दिली तीं उत्तरें खालीं देत आहें.

प्रश्न—' तूं कोण आहेस, कोठून आलीस व या झाडाला कशाला धरलेंस ?'

उत्तर—' मी गडावरची असून जातीची भिल्लीण आहे. हें झाड माहेराहून सासरीं येतांना संध्याकाळचे वेळेस वेळापूर स्टँडजळ एक मोठा वृक्ष आहे तेथें उभें होतें. मीं या झाडाला विचारलें कीं, तूं येथें कां आलीस ? नंतर मीं तिला झपाटलें.

प्रश्न—मग आतां जातेस कीं नाहीं ?

उत्तर—जातें-जातें.

प्रश्न— साईबाबांची शपथ घेऊन सांग कीं, मी परत येणार नाहीं.

उत्तर—मी परत येणार नाहीं.

त्यावर श्री. प्रधान यांचे सांगण्यावरून वावळे व त्यांच्या आत्याबाई यांनीं सुशिलाबाईस धरून त्यांना बाबांच्या समाधीजवळ नेलें व समाधीच्या पायरीवर त्यांचें डोकें ठेवलें. नंतर श्री. वावळे व श्री. प्रधान यांनीं सुशिलाबाईंचे अंगावर सारखा बाबांच्या उदींचा मारा केला. थोड्याच वेळांत बेशुद्धावस्थेंतच सुशिलाबाई म्हणाल्या कीं, साईनाथ मला मारतात, मी जातें, जातें. असें त्रिवार बोलून त्या मागच्या मागें धाडकन् खालीं पडल्या. तेव्हां श्री. प्रधान यांची खात्री झाली कीं भूत निघून गेलें. म्हणून त्यांनीं वावळे यांस सांगितलें कीं तुम्ही कोणीही बाईस न शिवतां त्यांना एकट्याच समाधीला निदान एक तरी प्रदक्षणा घालण्यास लावा म्हणजे कांहीं भीति नाहीं. त्याप्रमाणें श्री. वावळे यांनीं आपले कुटुंबांस सांगतांच त्यांनीं एकट्यानेंच हळूहळू समाधीस एक प्रदक्षणा घातली.

त्यानंतर सुशिलाबाईंचें आजारीपण संपलेंच. त्या पुन्हां कधीं बेशुद्ध पडल्या नाहींत व आतां त्या घरांतलीं रोजचीं कामें इतरासारखींच करतात. श्री. वावळे आपले कुटुंबासह नुकतेच श्रीसाईनाथांचें दर्शन घेण्यास पुन्हां शिर्डीस आले होते. त्या वेळेस ते मजजवळ म्हणाले, ' खरोखर केवळ श्रीसाईनाथांच्या कृपेमुळेंच आमचा संसार आतां पुन्हां पूर्ववत सुरळीत चालला आहे व त्यांच्यामुळेंच आतां आम्ही पूर्ण सुखी आहोंत.'

★

## २ साईबाबा नवसाला पावले

श्री. दत्तोबा विष्णू वाणी हे बारामतीचे राहणारे असून ( जिल्हा पुणें ) धंदा मोटार-ड्रायव्हरचा आहे. वालचंदनगर शुगर फॅक्टरींत त्यांना नोकरी होती. परंतु स्वतंत्र धंदा करण्याची इच्छा म्हणून त्यांनीं नोकरीचा राजीनामा दिला. ता. १५ ऑगस्ट रोजींच स्वतंत्र धंद्यास सुरवात करावी अशी त्यांची फार इच्छा होती. परंतु ऑगस्ट

उजाडला तरी धंदा सुरू होण्याचें लक्षण दिसेना. उलट स्वतंत्र धंदा निघतो कीं नाहीं याचीच त्यांना काळजी वाटूं लागली. आतांपर्यंत त्यांना श्रीसाईबाबांची विशेषशी माहिती नव्हती. परंतु ह्याच वेळेस त्यांचे मेव्हणे श्री. दत्तात्रय धोंडिबा कळसकर हे त्यांचे घरीं आले. ते श्रीबाबांचे एक भक्त आहेत. त्यांनी श्री. वाणी यांना धंद्याबद्दल कोणतीही काळजी न करण्यास सांगितलें. तसेंच त्यांना श्री. कळसकर यांनीं श्रीबाबांबद्दलची सर्व माहिती देऊन एकदां शिर्डीस जाऊन बाबांच्या समाधीचें दर्शन त्वरित घेण्याचा सल्ला दिला व सांगितलें कीं, समाधीस कांहीं तरी नवस करा म्हणजे तुमचें काम तुमच्या इच्छेप्रमाणें होईल. बाबांची समाधी म्हणजे एक अत्यंत जागृत स्थान असून तिला केलेला नवस पूर्ण सफल होतो. 'नवसास पावेल माझी समाधी' असें स्वतः श्रीबाबांनीच म्हटलें आहे व तें सर्वस्वीं खरें आहे. त्यानंतर श्री. कळसकर यांनीं वाणी यांना बाबांचें एक लॉकेट व फोटो दिला. श्री. वाणी यांनीं लॉकेट गळ्यांत घातलें व बाबांच्या फोटोची भक्तिभावपूर्वक मनानें रोज पूजा करूं लागले. नंतर तारीख ८ ऑगस्ट १९५२ रोजीं ते शिर्डीस आले व समाधीचें दर्शन घेऊन आपलें काम सफल करण्याची त्यांनीं श्रीबाबांस प्रार्थना केली व नवस केला, कीं जर त्यांच्या इच्छे-प्रमाणें काम झाले तर शिर्डीस ५ सुवासीण ब्राह्मण जेवावयास घालूं. त्यानंतर ते परत आपल्या गांवीं म्हणजे बारामतीस गेले. आश्चर्याची गोष्ट अशी कीं १३ ऑगस्टपर्यंत त्यांच्या कामाचें कांहींच जमलें नाहीं, परंतु तां. १४ ऑगस्ट रोजीं कांहीं तरी चमत्कार झाल्याप्रमाणें कोणतीही कल्पना नसतांना त्यांच्या धंद्याचा सौदा एकदम ठरला गेला व ता. १५ ऑगस्टपासून स्वतंत्र धंद्यास प्रारंभ झाला. अशा रीतीनें श्रीबाबांनीं त्यांची इच्छा पूर्ण केली व त्यामुळें केलेला नवस फेडण्याकरतां म्हणून ते ता. २८-१०-५२ रोजीं परत शिर्डीस आले व ता २९-१०-५२ रोजीं त्यांनीं ५ सुवाशीण ब्राह्मण यांस जेवण घातलें.

★

## ३ बाबा भक्ताच्या हांकेला धांवून आले

### श्री. द. सु. आठवले, माटुंगा, मुंबई, हे लिहितात—

माझी श्रीसाईबाबांच्या ठिकाणीं भक्ती आहेच व ती खालील कारणामुळें आणखी दृढ झाली आहे. मी आज १।२ वर्षे शिर्डीस बाबांच्या समाधीच्या दर्शनाला जाण्याची इच्छा धरून होतों, पण योगायोग येत नव्हता; पण ह्या वर्षी नक्कीच जावयाचें असें ठरविलें होतें व त्याप्रमाणें मी माझ्या व्यवस्थेला लागलों. माझा बेत २४ जाने-वारी १९५३ ला जाण्याचा होता. मीं माझे पैसे येणाऱ्यांना सांगितले होतें कीं मी २४ तारखेस जाणार आहे, व त्यासाटीं मला पैसे लागतील; पण आयत्या वेळीं सर्वांनीं कांहीं ना कांहीं सबबी सांगून टाळाटाळ केली, व संध्याकाळीं ६॥ वाजेपर्यंत माझ्या हातांत दिडकी पण आली नव्हती. मीं सर्व भार बाबांच्यावर ठेवला व माझे साहाय्यकर्ते

व माझ्याविषयीं विशिष्ट आपलेपणाची भावना ठेवणारे, दादरचे सुप्रसिद्ध रहिवाशी श्रीमंत शंकर नारायण काणे ह्यांना माझी सत्यस्थिति निवेदन केली. व सांगण्यास मला खरोखर आनंद वाटतो कीं, त्यांनीं मला तात्काळ ४० रुपये काढून दिले; माझा पूर्ण विश्वास आहे कीं हें केवळ श्री सद्गुरु साईबाबांच्याच प्रेरणेनें झालें असावें. माझी कल्पनाही नव्हती कीं कोणाची मला अशी आयत्या वेळीं मदत मिळेल. कोणी नास्तिक व आधुनिक विचाराचे लोक ह्यांच्यांत कांहीं मानणार नाहींत, पण माझ्यासारखा परिस्थितीनें होरपळून निघालेला माणूस, केवळ भक्तिभावानेंच जगत असतो व परमपूज्य सद्गुरु बाबांच्याच वचनांत सांगावयाचें म्हणजे, 'जर तुम्ही माझ्याकडे पाहाल तर मी तुमच्याकडे पाहीनच' ह्या उक्तीची आठवण झाल्यावांचून रहात नाहीं.

★

## ४ कमूबाबा आणि साईबाबा

श्री. कृष्णा व्यंकटेश भांगले, ( राहणार, सुभद्रा–निवास, घ. नं. १२३/Δ वरळी कोळीवाडा, मुंबई नं. १८ ) हे नुकतेच शिरडीस श्रीसाईबाबांचे दर्शनास आले असतांना श्रीसाईप्रभावाचे पुढील अनुभव त्यांनीं सांगितले.

श्री. भांगले यांची लहानपणापासून देवावर अत्यंत श्रद्धा होती. त्यांनीं आतांपर्यंत हिंदुस्थानांतील बहुतेक सर्व तीर्थांच्या यात्रा केलेल्या आहेत. परंतु आश्चर्याची गोष्ट अशी कीं, सप्टेंबर १९५१ पर्यंत त्यांना श्रीसाईबाबांची कांहींच माहिती नव्हती. त्या महिन्यांत ते ज्या कंपनींत नोकरी करीत होते ती त्यांची नोकरी अचानक सुटली. कुटुंबवत्सल असल्यामुळें चरितार्थाची काळजी अर्थातच उत्पन्न झाली. त्यांनीं आपल्या इष्ट देवतांचीं आराधनें केलीं; पण दुसरीकडे कुठें नोकरी लागेना व काळजी कांहीं दूर होईना. अशा स्थितींत श्री. वैद्य नांवाच्या त्यांच्या एका मित्रानें सहज बोलतां बोलतां त्यांना श्रीसाईबाबांबद्दल बरीच माहिती सांगितली व शिर्डीस जाऊन बाबांच्या समाधीचें दर्शन घेऊन येण्याचा सल्ला दिला. त्यावर श्री. भांगले म्हणाले कीं, सध्यां आपण आर्थिक अडचणींत असल्यामुळें इतका प्रवासखर्च करण्याची आपली ऐपत नाहीं. तेव्हां गोरेगांवास कमूबाबा म्हणून एक सत्पुरुष असून ते साईभक्त आहेत व त्यांची भेट घेतल्यास तुला साईबाबांचा पूर्ण अनुभव येईल असें श्री. वैद्य यांनीं भांगले यांस सांगितलें.

तेव्हां एके दिवशीं श्री. भांगले हे गोरेगांवास कमूबाबांकडे गेले. दुपारीं १२।१२॥ चा सुमार होता. त्या वेळेस कमूबाबा जेवण्यास घरांत गेले होते. त्यांचे माळ्यानें श्री. भांगले यांस सांगितलें कीं आतां कमूबाबांची भेट ३।३॥ वाजेपर्यंत होणें शक्य नाहीं. तेव्हां त्यांना फार वाईट वाटलें. कारण त्यांची मुंबईस आणखी कांहीं कामें असल्यामुळें त्यांना कमूबाबांस भेटून लवकर परतावयाचें होतें. म्हणून ते कंपौंडच्या बाहेरील दरवाजाजवळच कमूबाबा कदाचित अचानक बाहेर येतील व आपणांस दिसतील या आशेनें वाट पहात उभे राहिले. मनांतून मात्र ते साईबाबांचें वारंवार स्मरण करूं लागले. त्याच वेळेस

त्यांनीं श्रीबाबांस प्रार्थिलें कीं, "बाबा, कसेंही करून माझी व कमूबाबांची भेट होऊं द्या व माझेवरील संकट निवारण करा." तों काय आश्चर्य! त्याच वेळेस त्यांना कंपौंडांतून कोणी तरी २।३ माणसें बोलत असल्यासारखा आवाज ऐकूं आला. म्हणून ते पाय उंच करून आंत पाहूं लागले. तोंच २।३ माणसें आपणाकडेच येत असलेलीं त्यांस दिसलीं. त्यांपैकीं एक गृहस्थ अगदीं यांचेजवळ आले व यांना म्हणाले कीं, 'काय पाहिजे?' त्यावर श्री. भांगले म्हणाले, 'मला कमूबाबा पाहिजेत.' तेव्हां लगेच त्या गृहस्थानें श्री. भांगले यांचा उजवा हात धरला व त्यांना म्हटलें, 'अरे, तुझी नोकरी गेली वाटतें?' आपलें संकट ज्याअर्थी ह्या गृहस्थानें बरोबर ओळखलें त्याअर्थी हेच गृहस्थ कमूबाबा होत अशी श्री. भांगले यांची पक्की खात्री झाली व त्यांना श्रीसाईलीलेचें कौतुक वाटून त्यांचें मन आनंदून गेलें. कारण श्रीबाबांनीं त्यांची प्रार्थना ऐकली व अशक्य गोष्ट शक्य झाली.

नंतर कमूबाबांनीं साईबाबांचें नांव घेऊन यांना आशीर्वाद दिला व ते म्हणाले, 'अरे काळजी कशाला करतोस? तूं घरीं जा. तुला नोकरी मिळेल.' त्यानंतर श्री. भांगले घरीं गेले. दुसरे दिवशींच संध्याकाळीं दुसऱ्या एका फर्मचा भागीदार यांचे भावास भेटला व त्यांना म्हणाला, 'अरे, तुझ्या भावाची नोकरी सुटली असें मीं ऐकलें आहे. माझ्या फर्ममध्यें तुझ्या भावास लायक अशी जागा आहे तर त्याला मजकडे पाठवून दे.' परंतु श्री. भांगले कांहीं त्या गृहस्थांकडे गेले नाहींत, कारण ते त्यांना पूर्ण ओळखत होते व पूर्वी श्री. भांगले यांचें व या भागीदाराचें भांडण झालें होतें. नंतर ४।५ दिवसांनीं ह्या भागीदारानें श्री. भांगले यांस आपणाकडे पाठवून देण्याबद्दल पुन्हां यांचे भावास कळकळीनें सांगितलें. तेव्हां, आपण त्या भागीदाराकडे जावें अशी श्रीसाई-बाबांचीच इच्छा दिसते असें समजून ते त्या गृहस्थाकडे गेले. तों आश्चर्याची गोष्ट अशी कीं त्या गृहस्थानें पूर्वीचें सर्व भांडण विसरून श्री. भांगले यांना अत्यंत आदरानें वागविलें व नंतर त्यांना आपल्या फर्ममध्यें एक चांगल्यापैकीं नोकरी दिली.

या प्रसंगानंतर श्री. भांगले यांचा साईबाबांवर फार विश्वास बसला व आतां आपणांस खरे सद्गुरु मिळाले म्हणून त्यांना आनंद झाला. त्यानंतर ते शिर्डीस श्रीसाई-बाबांचे दर्शनास वारंवार येऊं लागले.

★

## ५ 'माये'च्या जन्माची कथा

सौ. प्रेमलता सी. उपरकर (राहणार गोपाळ मॅन्शन, खोली नं. २५, गोखले रोड [साऊथ], मुंबई नं. २८) यांचा एक अनुभव खालीलप्रमाणें आहे :—

'माझें लग्न होऊन १२ वर्षें झालीं होतीं; मूलबाळ कांहीं झालेंच नाहीं. दोनतीन डॉक्टरांकडून तपासून घेतलें. त्यांनीं सांगितल्याप्रमाणें औषधेंही घेतलीं. पण उपयोग नाहीं. अशा स्थितींत सन १९४६ मध्यें आमच्या चाळींत राहणाऱ्या सौ. इंदिराबाई

॥ श्री साईबाबा संस्थान ) शिर्डी



आंबेरकर यांनीं मला बाबांची माहिती दिली. तोंपर्यंत मला श्रीबाबांची कांहींच माहिती नव्हती. बाबांची माहिती ऐकून शिर्डीस जावें असें वाटूं लागलें. त्याप्रमाणें मी व माझे यजमान त्याच सालीं प्रथमच शिर्डीस बाबांचें दर्शन घेण्यास आलों. २।३ दिवस राहिलों व नंतर परत जातांना इतर लोकांप्रमाणें मींही श्रीबाबांचा एक फोटो विकत घेतला व तो बाबांच्या समाधीवर ठेवून व त्याची पूजा करून बरोबर घरीं घेऊन गेले. त्या फोटोची मग मी अगदीं मनोभावें नित्य पूजा करूं लागलें.

'त्यानंतर पुन्हां १९४७ मध्यें मी दुसऱ्यांदा शिर्डीस गेलें. ह्या खेपेला मी शिर्डीत असतांनाच एके रात्रीं स्वप्नांत मला श्रीबाबांची समाधि दिसली व एक अगदीं बाबां-सारखाच पोषाख घातलेला म्हातारा येऊन त्यानें मला समाधीवरील एक वेणी उचलून दिली. त्यानंतर मी जागी झालें. तेव्हां 'तुझी मनकामना सफल होईल व तुला मुलगी होईल' असें या दृष्टांतद्वारें श्रीबाबांनीं आपणांस सुचविलें असें मला वाटलें. त्यानंतर थोड्याच दिवसांत आम्ही मुंबईस परत गेलों.

'परंतु बरेच महिने लोटले तरी मला मूल होईल असें कांहीं चिन्ह दिसेना. मला फार वाईट वाटूं लागलें.. पुष्कळ भक्तांनीं मला सांगितलें कीं, तुम्ही वाईट वाटून घेऊं नका, बाबांवर निष्ठा ठेवा व सबुरी धरा. पण सबुरी म्हणजे किती दिवस? सबुरीचा काल वाढत चालला म्हणजे निष्ठाही डळमळूं लागते. माझेंही मन थोडेंसें चलबिचल झालें व मी अगदीं रडकुंडीस आलें. अशा स्थितींत एके दिवशीं आमच्या चाळींत राहाणाऱ्या एका कुटुंबाच्या आग्रहावरून त्यांच्या फॅमिली डॉक्टरांकडून (डॉ. दांडेकर, किंग्ज सर्कल, मुंबई) मीं माझी प्रकृती तपासून घेतली. त्यांनीं सांगितलें कीं, 'तुझा गर्भाशय संततीं धारण करण्यास योग्य नाहीं. मी औषध देतों, पण देवाची कृपा असेल तरच तुला गर्भ राहील. पहा!' देवाची कृपा असेल तरच हे शब्द ऐकतांच मी चपापलें. कारण श्रीबाबांवरील माझी निष्ठा जरा डळमळूं लागली होती. पण सांईबाबांनींच जणुं कांहीं मला सावध करण्याकरतां म्हणून डॉक्टरांच्या तोंडून वरील शब्द वदविले असें मला वाटलें. डॉक्टरांनीं सांगितल्याप्रमाणें मीं औषधें घेण्यास सुरवात केली. परंतु औषधांचा खर्च दर आठवड्यास १२ ते १५ रुपये होऊं लागला व आमच्या आर्थिक स्थितीला तो झेपेना; म्हणून ३।४ आठवड्यांनंतर तीं सर्व औषधें घेणें मला सोडून द्यावें लागलें.

'अखेर एक दिवस मी बाबांच्या फोटोची पूजा करीत असतांना मला माझ्या स्थितीबद्दल फारच वाईट वाटून मी अगदीं रडकुंडीस आलें व बाबांना म्हणालें, 'बाबा, माझी अजून तुम्हांस कां दया येत नाहीं? मीं आपली अगदीं मनोभावें सेवा करीत आहें. पण माझ्या सेवेंत कांहीं चूक होत आहे का? किती दिवस मी वाट पाहूं? मला घराबाहेर पडण्यासही आतां बरें वाटत नाहीं. लोक मला वांझ म्हणतील व माझ्याकडे बोट दाखवून नाक मुरडतील. तरी आतां मजवर लवकर कृपा करा.' अशा तऱ्हेची मी अगदीं अत्यंत कळवळून प्रार्थना करीत असतांनाच श्रीसाईबाबांच्या फोटोला घात.

PERSONAL LIBRARY

लेल्या हारांतून एक फूल सुटून माझ्या ओंटींत पडलें व, तें फूल म्हणजे बाबांचा प्रसाद होय, असें समजून मीं तें अगदीं जपून ठेवलें. नंतर दुसरीं कोणत्याही प्रकारचीं औषधें न घेतां मीं माझ्या पोटास रोज बाबांची उदी लावण्याचा नियम ठेवला व बाबांची अगदीं अनन्यभावानें करुणा भाकूं लागलें.

'त्यानंतर अगदीं थोड्याच दिवसांत मी गरोदर राहिलें. सगळ्यांची समजूत अशी कीं, मला मुलगा होईल. पण मी बाळंतीण होण्याचे अगोदर २ दिवस माझ्या पतींना एक स्वप्न पडलें व त्यांना सगळीकडे वणवा पेटलेला दिसला. स्वप्नांतच त्यांनीं त्या वणव्यावर बाबांची विभूति टाकून बाबांचा धांवा करण्यास सुरवात केली. त्याबरोबर दोन पांचसहा वर्षांच्या मुली माझ्या यजमानांकडे धांवत आल्या व त्यांनीं माझ्या यजमानांना मिठी मारली. तुम्ही कोण? म्हणून विचारतांच आपण माया आहोंत असें त्या म्हणाल्या. नंतर माझे पती जागे झाले.

'तेव्हां मला मुलगा न होतां मुलगीच होईल अशी आमची खात्री झाली. त्यानंतर मी तारीख ४ सप्टेंबर १९४९ रोजीं कोणत्याहि प्रकारचा त्रास न होतां अगदीं सुखरूप बाळंतीण झालें. मला झालेल्या मुलीचा चेहरा व माझ्या यजमानांनीं स्वप्नांत पाहिलेल्या मुलीचा चेहरा यांत अगदीं तंतोतंत साम्य जुळल्यामुळें मुलीचें नांव माया असें ठेवलें आहे.

★

## ६ खटलाहि जिंकला व आजारहि गेला

सतत १० वर्षें अत्यंत त्रास देणाऱ्या भगंदर सारख्या जीर्ण रोगांतून, कीं ज्याचेमुळें शेवटीं नोकरींतून अवेळीं (Premature) घरीं बसावें लागलें, आपण केवळ श्रीसाईबाबांच्या कृपेमुळेंच कसे कायमचे मुक्त झालों हें श्री. लक्ष्मण गणपत जाधव, पेन्शनर पोलिस हवालदार, (राहणार आनकाईची आंब्रेवाडी, तालुका येवला, जिल्हा-नाशिक) यांनीं आपल्या खालील अनुभवांत सांगितलें आहे. आपलीं पुष्कळशीं संकटें श्रीसाईबाबांच्या कृपेमुळें निवारलीं गेलीं व त्यांचीही हकिकत ओघांत त्यांनीं आपल्या अनुभवांत सांगितली आहे.

'मी पोलिस खात्यांत वयाच्या १७ व्या वर्षी नोकरीस लागलों. नोकरींत असतां-नाच भगंदर नांवाचा रोग जडला. या रोगानें मला फार त्रास दिला. सारखा पूं वहात असे. ३।४ वेळां ऑपरेशन करूनही कांहीं फायदा झाला नाहीं. तात्पुरता गुण येई, पण पुन्हां त्रास आपला कायमच. असा त्रास जवळ जवळ १० वर्षें झाला व माझा पुष्कळ पैसा या दुखण्या-पायीं खर्च झाला. शेवटीं वैद्यकीय दृष्ट्या मला नोकरी करण्यास नालायक ठरविण्यांत आलें, व त्यामुळें खात्यानें मला नोकरींतून पेन्शनींत काढलें. ता. १३–१–१९४८ रोजीं मी पेन्शन घेऊन आनकाईची आंब्रेवाडी येथें स्थाईक झालों.

'नोकरींतून घरीं बसलों तरी रोग थोडाच बरा झाला होता ! त्यांत आणखी दुसऱ्या कटकटी सुरू झाल्या. माझ्या दुष्मनांनीं माझ्यावर कोर्टांत फिर्यादी केल्या व माझ्या विरुद्ध असा कांहीं बनाव रचला गेला कीं मी या खटल्यांतून सहीसलामत व अहर्निशी सुटेन असें मलाही वाटेना. मला भीति वाटूं लागली कीं खटला माझ्या विरुद्ध जाईल व मला निदान २।३ वर्षांची तरी सजा होईल; आणि त्यामुळें अर्थातच सरकारही माझें पेन्शन बंद करील. माझ्या बचावाची मीं खटपट केलीच होती, पण यश येण्याचें चिन्ह दिसेना. खटला येवलें कोर्टांत चालू होता. तारखा चालूच होत्या. अशांत सन १९४९ सालीं असाच एकदां येवल्यास कोर्ट कामाकरितां गेलों असतां माझे सुदैवें करूनच एका साईभक्त मनुष्याची तेथें अचानक गांठ पडली. तो जातीचा खत्री असून ब्रह्मचारी होता. बोलतां बोलतां सहज त्यास मीं माझ्या संकटांची व रोगाची हकीकत सांगितली. त्यावर त्यानें मला धीर दिला व शिर्डीस जाऊन श्रीबाबांच्या समाधीचें दर्शन घेण्यास सांगितलें, आणि बाबांना आपल्या सर्व संकटांचें निवेदन करण्याचा उपदेश केला. "भक्तियुक्त अंतःकरणानें आपण बाबांना शरण गेल्यास बाबा आपल्याला कधींही दूर लोटीत नाहींत. बाबांनीं म्हटलेंच आहे कीं 'जाणा येथें आहे साहाय्य सर्वांस । मागें जें जें त्यास तें तें लाभे ।।' हें सर्वस्वीं अजूनही खरेंच आहे.' असेंही त्या मनुष्यानें बाबांची आणखी माहिती देतांना मला सांगितलें व शिर्डीस जाण्याचा पुन्हां एकदां मला उपदेश केला.

'मला बाबांची आतांपर्यंत अगदींच कांहीं माहिती नव्हती असें नाहीं. परंतु दुर्दैवानें त्यांचेकडे धांव घेण्याची बुद्धि आतांपर्यंत मला झाली नाहीं. पण वरील साई-भक्ताचें कळकळीचें बोलणें माझ्या मनावर इतकें ठसलें कीं मीं तत्काल शिर्डीस जाण्याचा बेत केला. त्या दिवशीं मंगळवार होता व खटल्याचा निकाल लागणार होता. परंतु कांहीं कारणानें तारीख पुढें ढकलली गेली. तेव्हां हेंही एक प्रकारें बरेंच झालें असें वाटून मनास आनंद झाला. माझ्याबरोबर आमच्या गांवचा कोंडाजी महादू भालेकर हा येण्यास तयार झाला. माझ्या हितशत्रूंनीं त्यासही माझ्याबरोबर खटल्यांत गोवलें होतें. आम्हीं दोघे बुधवारीं शिर्डीस आलों व गुरवारीं शिर्डीस राहून नंतर परत गेलों. बाबांना मीं माझें संकट निवेदन केलें व सांगितलें कीं, 'बाबा जर ही माझ्यावरची फिर्याद रद्द होऊन त्यांतून मी अब्रूनिशीं बाहेर पडलों तर मी शिर्डी येथें एक नवसाचा सत्यनारायण करीन व नंतर माझा रोग बरा होईपर्यंत शिर्डीस आपल्या समाधीचें दर्शन घेण्याकरितां दर गुरुवारची वारी करीत जाईन. आपणच समर्थ आहांत तरी माझा रोग बरा करा.'

'त्यानंतर अगदीं पुढच्याच तारखेस आमचा खटला येवलें कोर्टांत चालून कोर्टानें मला व माझे जोडीदारास निर्दोष ठरविलें व २०३ कलमाखालीं कोर्टानें फिर्याद दप्तरी दाखल करून आम्हांस सोडून दिलें. यामुळें श्रीसाईबाबांवरील माझी श्रद्धा साहजिकच वाढली व नवस केल्याप्रमाणें दर गुरुवारीं मी शिर्डीस येऊं लागलों. ४।५ गुरुवारांनंतर

सन १९५० सालीं मी शिर्डी येथें बाबांच्या मंदिरांत सत्यनारायण केला व माझा पहिला नवस फेडला. नंतर गुरुवारची वारी सुरू केल्यापासून माझा भगंदर रोग हळूहळू कमी होत चालला व डिसेंबर १९५० मध्यें साफ नाहींसा झाला. या काळांत बाबांचें तीर्थ व उदी याशिवाय दुसरें कोणतेंही औषध मी या रोगाकरितां घेत नव्हतों. डिसेंबर १९५० मध्यें जो रोग थांबला तो कायमचाच. त्यानंतर अजूनपर्यंत कोणताहि त्रास झाला नाहीं.

★

## ७ बाबांचा वेळेवर इशारा मिळाला—

श्रीमती सौ. सुरजबाई कासलीवाल जैन (राहणार खामगांव-वऱ्हाड) यांचा अनुभव पुढीलप्रमाणें:—

'तुमचा मी भार वाहीन सर्वथा। नव्हे हें अन्यथा वचन माझें॥' श्री साईबाबांच्या या वचनाचा प्रत्यय त्यांच्या भक्तांस पदोपदीं येतो. ता. १९-५-१९५२ च्या रात्रीं मला खालील स्वप्न पडलें—

'मी श्रीमहावीरजींचे यात्रेस गेलें. तेथें श्रीमहावीरजीच्या मंदिराबाहेरच आमच्या गांवचे एक गृहस्थ आपल्या पत्नीसह दिसले. यांचा व


॥ श्री साईनाथ प्रसन्न ॥

# बॉम्बे सिल्व्हर शॉप

टेलिफोन : २६१६२

शुद्ध चांदीचा हरेक तऱ्हेचा माल बनविण्याचें व ऑर्डरप्रमाणें माल करून देण्याचें विश्वासलायक ठिकाण. त्याचप्रमाणें सोन्याचाही माल ऑर्डरप्रमाणें करून देण्यांत येतो. एकदां भेट देण्याची तसदी घेऊन खात्री करून घेण्याची विनंती आहे.

गिरगांव मंगलवाडी<br>श्री धूतपापेश्वर प्रासाद<br>मुंबई नं. ४

वा. गो. जुवेकर<br>मालक

माझा देण्याघेण्याच्या व्यवहारांत संबंध असून देखील व श्रीमहावीरजीसारख्या क्षेत्राच्या ठिकाणीं व परस्थळीं आमची भेट झाली असतां तें जोडपें माझ्याशीं कांहींच फसें बोललें नाहीं याचें मला राहून राहून आश्चर्य वाटत होतें. तरीपण श्रीमहावीर-स्वामींच्या दर्शनपूजनाची मला घाई असल्यामुळें मीं त्यांच्या या वागणुकीकडे विशेष लक्ष न देतां सरळ मंदिराच्या पायऱ्या चढून देवळांत गेलें.

आणि श्रीमहावीरजींच्या मूर्तीकडे पाहतांच मला मोठा आश्चर्याचा धक्का बसला. कारण त्या ठिकाणीं श्रीमहावीरजींच्या मूर्तीऐवजीं मला श्रीसाईबाबाच बसलेले दिसले. मला विचार करण्यासही बाबांनीं सवड दिली नाहीं. बाबांची व माझी दृष्टादृष्ट होतांच मजकडे पाहून बाबा हंसत हंसत म्हणाले 'यें देख! वो बाहर जो लोक तुझें मिलें है, उनसे सावधान रहना। उनकें मनमें तेरे लिये बद्दी (विश्वासघात) है!' बस! हें ऐकतांच मी जागी झाल्यें.

'स्वप्नांत दिसलेल्या गृहस्थाचा व माझा देण्याघेण्याचा व्यवहार असून त्या व्यवहाराची मुदत लवकरच फायदेशीर रीत्या संपणार होती. माझ्या मनींमानसींही नसतां बाबांनीं ही सूचना दिल्यामुळें मी सावध झालें. तेव्हां तावडतोब हा देण्याघेण्याचा व्यवहार आपसांत सुखासमाधानें व समजुतीनें करून घेण्याचा पुष्कळ प्रयत्न केला. परंतु त्या गृहस्थानें भलेपणाचा व सद्भावनेचा आव आणून टाळाटाळ चालविली. शेवटीं मुदतीचे दिवशीं मला त्यांचे विरुद्ध कायद्याचा आश्रय घ्यावा लागला.

'जर बाबांनीं ही अगाऊ सूचना देऊन मला सावध केलें नसतें तर त्या गृहस्थाच्या वर्तनाचा मला जराही संशय आला नसता व मी त्याच्या बतावणीस बळी पडलें असतें. त्यामुळें कायद्याचाही आधार नष्ट होऊन परिणामीं मला माझ्या मिळकतीस मुकावें लागतें. तो प्रसंग बाबांच्या कृपेमुळें व त्यांनीं आधींच मला सावध केल्यामुळें टळला.

'सर्व धर्म, पंथ व देवता या वस्तुतः एकच कशा आहेत हें व्यापक तत्त्व श्रीबाबांनीं या दृष्टांतद्वारें दर्शविलें असें मला वाटतें. तसेंच बाबा हे आपल्या भक्तांच्या ऐहिक लाभालाभाबद्दल देखील किती सावध असतात व भक्तांना अजूनही वेळोवेळीं कसें योग्य मार्गदर्शन करतात याचा प्रत्यय येतो.'

ग्रामपंचायती, सर्वोदय केंद्रें, सार्वजनिक वाचनालयें, धार्मिक लोव
संस्थांचे ट्रस्टीज यांना जनता-जनार्दनांत आपल्या पूज्य साधु-
संतांची वाणी ग्रंथरूपें अव्याहतपणें चालू ठेवण्यास उत्तम संधि !

# निर्णयसागरांतील चौदा रत्नें

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १. | नवनाथ भक्तिसार | .... ग्लेज | .... | किं. | १६—०—० |
| २. | भक्तिविजय | .... ,, | .... | ,, | १८—०—० |
| ३. | रामविजय | .... ,, | .... | ,, | १६—०—० |
| ४. | हरिविजय | .... ,, | .... | ,, | १४—८—० |
| ५. | दासबोध | .... पोथी | .... | ,, | ५—०—० |
| ६. | शिवलीलामृत | .... ,, | .... | ,, | ४—०—० |
| ७. | रुक्मिणीस्वयंवर | .... ,, | .... | ,, | २—०—० |
| ८. | तुकारामचरित्र | .... | .... | ,, | ७—०—० |
| ९. | द्रौपदीस्वयंवर | .... | .... | ,, | २—०—० |
| १०. | ज्ञानेश्वरीसारामृत | .... | .... | ,, | २—४—० |
| ११. | कीर्तनसुधाधारा भाग १ ला | | .... | ,, | ४—०—० |
| १२. | कीर्तनसुधाधारा भाग २ रा | | .... | ,, | ६—०—० |
| १३: | गीता सार्थ ( सुबोध चंद्रिका ) | | .... | ,, | १—८—० |
| १४. | विष्णुसहस्रनामार्थमंजरी | | ... | ,, | १—०—० |
| | | | | | ९८—१२—० |

वरील पुस्तकांचा संपूर्ण सेट आमच्या ग्राहकांस ता. ३१-५-१९५३ पर्यंत फक्त रु. ७५—०—० किंमतीस देण्यांत येईल.

( टपाल खर्च वेगळा )

इतर पुस्तकांसाठीं कॅटलॉग मागवा.

## निर्णयसागर प्रेस,

२६—२८ कोलभाट स्ट्रीट, मुंबई नं. २

( टे. फो. नं. २२२९० )



—श्री रामनवमी–उत्सवांतील कांहीं दृश्यें—

# — श्रीक्षेत्र शिरडी संस्थानचा रामनवमी उत्सव —

लेखक:—जिज्ञासु

श्रीसाईलीलेच्या या रामनवमीच्या खास अंकांत शिरडीस हा उत्सव कसा वाढत गेला यासंबंधीं जुना इतिहास नवीन साईभक्तांचे माहितीकरितां देण्याचें योजिलें आहे.

रा. गोपाळराव गुंड नांवाचे एक गृहस्थ कोपरगांवला मुलकी सर्कल इन्स्पेक्टर होते. त्यांना तीन बायका असूनही पुत्रसंतति नव्हती. श्रीसाईबाबांचे आशीर्वादानें त्यांना मुलगा झाला. त्यामुळें त्यांची भक्ति बाबांचे चरणीं दृढ झाली. सन १८९७ सालांत त्यांना वाटलें, कीं श्रीबाबांप्रीत्यर्थ शिरडीस एखादी जत्रा किंवा 'उरुस' भरवावा. त्यांनीं आपली कल्पना ग्रामस्थ पुढारी रा. तात्या पाटील, रा. दादा कोते पाटील, श्री. माधवराव देशपांडे वगैरे मंडळीपुढें मांडली. त्यांना ती पसंत पडली. मात्र त्या-वेळच्या कुळकर्ण्यानें विरोध केला, त्यामुळें प्रथम परवानगी मिळण्यास अडचण पडली. परंतु या कल्पनेला श्रीसाईबाबांचा आशीर्वाद मिळून सर्व अडचणी दूर झाल्या. जत्रा केव्हां भरावी; असें बाबांना विचारलें. तेव्हां श्रीरामनवमीला भरावी अशी आज्ञा झाली. हा दिवस बाबांनीं मुद्दामच निवडला असावा. बाबांना पुष्कळ लोक कबीराचा अवतार मानतात. कांहीं लोक त्यांना प्रत्यक्ष श्रीहनुमानाचाही अवतार मानतात. ही जत्रा सुरू होण्यापूर्वीही बाबा रामनवमीचे दिवशीं मशीद स्वच्छ करून पणत्या, धुनी वगैरेवर गुलाल टाकीत असत, असे कांहीं जुने भक्त सांगतात. कांहींही उद्देशानें असो, बाबांनीं श्रीरामनवमीचा दिवस जत्रा भरण्यासाठीं निश्चित केला खरा.

चैत्राचे दिवस उन्हाळ्याचे, व त्यावेळीं गोदावरीचे कालवे शिरडी गांवांत आले नसल्यामुळें विहिरी थोड्या (अवघ्या दोन) व त्यांतही पाणी खूप खोल. तरीपण श्री. तात्या पाटलांनीं मोटा लावून पाण्याची सोय केली. जत्रेसाठीं दुकानांची व्यवस्था करावी लागली. करमणुकीकरितां कुस्त्या ठरविल्या. मिरवणुकीकरितां निशाणें पाहिजेत. त्याकरितां दोन निशाणांची व्यवस्था केली. रा. गोपाळराव गुंडांचे एक समदुःखी मित्रे नगरचे व्यापारी रा. दामुअण्णा कासार यांनीं एक निशाण देण्याचें कबूल केलें. दुसरें एक जरीचें निशाण बाबांचे निस्सीम भक्त रा. शं. र. उर्फ नानासाहेब निमोणकर यांनीं देण्याचें कबूल केलें. हीं दोन निशाणें गांवांतून मिरवीत आणून मग मशिदीवर दोन बाजूंना लावीत.

या निशाणांच्या मिरवणुकीशिवाय या 'उरुसा'निमित्त 'संदल' नांवाची एक मिरवणूक बाबांचे एक मुसलमान भक्त रा. अमीर शक्कर दलाल यांनीं बाबांचे परवानगीनें सुरू केली. उगाळलेलें चंदन व चंदनाचा भुस्सा एका थाळ्यांत घालून तो

झाला पुढें ऊद जाळीत गांवांतून फिरवावयाचा व मिरवणूक मशिदींत आल्यावर उगाळलेल्या चंदनाचे पंजे मशिदीच्या भिंतीवर उठवावयाचे. पुष्कळ प्रसिद्ध पीरांप्रीत्यर्थ अशी संदल काढण्याची पद्धत आहे. परंतु पीर जिवंत असतांच त्यांचे प्रीत्यर्थ संदल काढल्याचीं उदाहरणें मात्र थोडीं.

एकाच दिवशीं या दोन्ही मिरवणुकी निघत; व दोन्ही मिरवणुकींत हिंदु, मुसलमान एकदिलानें भाग घेत. देशांत पुढें हिंदु, मुसलमानांत पुष्कळ तंटे झाले, तरी शिरडींत मात्र त्यांचा पडसाद केव्हांही उठला नाहीं. केवढा हा संतप्रभाव! किंबहुना अशी समाजाची एकी व्हावी हाच बाबांचा हेतु रामनवमीला जत्रा भरण्यांत असावा!

उत्सवाची बाहेरची व्यवस्था रा. तात्या पाटील पहात, तशीच भोजनाची वगैरे अंतर्व्यवस्था बाबांचें वेळीं श्रीमती राधाकृष्ण आई पहात. त्यांचें घर या दिवसांत एखाद्या लग्नघराप्रमाणें गजबजलेलें असे. त्या स्वतः व त्यांचेकडे उतरणारी भक्तमंडळी यांना बिलकुल विश्रांति या दिवसांत मिळत नसे. बाबांची चावडींत झोंपण्याची पाळी असेल अशा रात्रीं मशीद सर्व धुऊन पुसून रंगविली जाई. मोठमोठी अधिकारी मंडळीसुद्धां ही सेवा जातीनें करीत. हें सर्व काम एका रात्रींत पुरें होई. या गोष्टीला बाबांचे हयातींत फक्त एकदांच खंड पडण्याची भीति उद्भवली होती, पण त्या खेपेला श्रीबाबा स्वतः दिवसा मंडपांत येऊन बसले व मशिद रंगविणेचें काम दिवसा पुरें झालें. जेवणाकरितां मोठमोठे लोक स्वतः खपून बुंदी पाडविणें, शिरा बनविणें वगैरे कामें करीत. मांडवांत बाबांचे नजरेखालीं पंक्ती उठत. याप्रमाणें चढत्या वाढत्या उत्साहानें हा क्रम सन १९१२ पर्यंत चालला होता.

सन १९१२ सालीं एक नवीन घटना घडली. त्या वेळीं श्रीमंत दादासाहेब खापर्डे सहकुटुंब शिर्डींत बरेच दिवस राहिले होते. त्यांचे बरोबर एक ह. भ. प. कृष्णराव जोगेश्वर भीष्म ('श्रीसगुणोपासने' चे कर्ते) नांवाचे गृहस्थ रहात होते. यांचे मनांत कल्पना आली कीं जत्रेबरोबर श्रीरामजन्माचा उत्सवही शिर्डीस साजरा करावा. त्यांनीं बाबांचे एक भक्त श्री. लक्ष्मणराव यांचेकडून ती कल्पना बाबांपुढें मांडली व तिला बाबांची परवानगी मिळाली, व सर्व भक्तांना मोठा आनंद झाला. सर्व तयारी झाली राधाकृष्ण आईनीं सुंठवडा तयार केला. त्यांच्या राधाकृष्णाचा पाळणा होता तो रामजन्माच्या उत्सवासाठीं त्यांनीं दिला. केळीचे खुंट, पताका, तोरणें लावून मशिदीपुढचा मंडप सुशोभित केला. नवमीला ११ वाजतां भीष्मबुवा कीर्तनास उभे राहिले. लक्ष्मणराव पेटी वाजविण्यास बसले. बाबांनीं त्यांना बोलावून घेतलें आणि निंबोणींतून दोन हार आणवून एक हार त्यांचे गळ्यांत घातला व एक बुवांच्या गळ्यांत घालण्यास सांगितलें. कथा वगैरे उत्तम झाली. शेवटीं रामजन्म होऊन गुलाल उधळला. सर्वत्र आनंदी आनंद झाला.

इतक्यांत मशिदींतून बाबांची सिंहगर्जना ऐकूं आली. त्यांनीं नारसिंह स्वरूप धारण केलें! जणूं काय 'अहंरूपी रावण व दुर्वृत्तिरूपी राक्षस' मारण्याकरितां बाबांनीं

हें रूप धारण केलें! जुन्या भक्तांना यांत विशेष वाटलें नाहीं. कारण कोठल्याही 'नव्या' उपक्रमाचे वेळीं बाबा असें रूप धारण करीत. प्रतिकूल ग्रहांची अशा प्रकारें बाबा शांति करीत असें कांहीं भक्तांचें म्हणणें होतें. श्रीमती राधाकृष्ण आईंना मात्र आपल्या पाळण्याची भीति वाटूं लागली व तो सोडण्याविषयीं त्या घाई करूं लागल्या. पण बाबांनीं तो सोडूं दिला नाहीं. हळूहळूं बाबा शांत झाले. नेहमींची दुपारची आरती झाली. तिसऱ्या प्रहरीं पाळणा सोडण्याची परवानगी मागितली तेव्हां बाबा म्हणाले, 'अजून काम कोठें संपलें आहे?' तेव्हां भक्तांनीं ठरविलें कीं बाबांची इच्छा दुसऱ्या दिवशीं काला करून उत्सव समाप्त करावा अशी आहे. त्याप्रमाणें दुसऱ्या दिवशीं दहीहंडी वगैरे होऊन उत्सवाची रीतसर समाप्ति झाली; आणि मग बाबांनीं पाळणा सोडणेस परवानगी दिली.

अशा रीतीनें या उरूस किंवा जत्रेला रामनवमीच्या उत्सवाची जोड मिळाली. अर्थात निशाणांची मिरवणूक, संदल, कुस्त्यांचे कार्यक्रम वगैरे सर्व पूर्वीप्रमाणेंच होत.

पुढील वर्षी जन्मोत्सवाचे कार्यक्रम वाढूं लागले. श्रीराधाकृष्ण आईंनीं चैत्र शुद्ध प्रतिपदेपासून अखंड नामसप्ताह (किंवा नवाह) सुरू केला. आई स्वतः उत्तम भजन करीत असत. दुसऱ्या वर्षी उत्सवाला बुवा म्हणून ह. भ. प. बाळाबुवा हे होते. तिसरें वर्षी बाळाबुवा सातारकर नांवाचे एक प्रसिद्ध कीर्तनकार होते त्यांनीं ९ दिवस कीर्तन केलें.

कीर्तनकारांची कायमची व्यवस्था व्हावी अशी लक्ष्मणरावांची इच्छा होती. ह. भ. प. दासगणु महाराज बाबांचे भक्त असून त्यांचेच कृपेनें उत्तम कीर्तनकार झाले होते. ते एकदां शिरडीस आले असतां लक्ष्मणरावांनीं बाबांना विनंति केली कीं, रामनवमीच्या उत्सवाचें कीर्तन दासगणूंनीं दरसाल करावें अशी आज्ञा झाली. ती शिरसावंद्य मानून सन १९१५ पासून श्री दासगणू रामनवमीचा उत्सव साजरा करूं लागले.

मिरवणुकीचा थाटही सालोसाल वाढतच गेला. एक सर्कसवाले या सुमारास शिर्डीस असत; ते आपला हत्ती कांहीं वर्षेपर्यंत दरसाल मिरवणुकीसाठीं देत. बाबांचा सुंदर घोडा होताच. यात्रा जवळजवळ पाऊण लाखपर्यंत वाढली. त्यामुळें बंदोबस्ताला पोलिस असत. मात्र दंगा धोका कधींही झाला नाहीं. हिंदुमुसलमान समाज एक दिलानें वागत. तसेंच एकदां मोहरम सण आला असतां कांहीं मुस्लीम बंधू श्रीसाईबाबांकडे गेले आणि मशिदींत ताजवा करण्याची परवानगी मिळविली. त्यांनीं ताजवा (ताबूत) ४ दिवस केला व पांचव्या दिवशीं श्रीसाईबाबांनीं हा ताजवा तेथून काढून टाकला. याच मशिदीला बाबा द्वारकामाई म्हणत, (अध्याय ७ ओवी ११–१२, साईसचरित).

बाबांनीं समाधि घेतल्यानंतर जी व्यवस्था झाली त्यांत संस्थान–कमिटीनें हा रामनवमीचा उत्सव श्री. दासगणु व श्री. तात्या पाटील यांचेकडे सोंपविला. वर्गणी जमा करणें, कीर्तन करणें, नामसप्ताह, अभिषेक वगैरे धार्मिक विधि करविणें वगैरे कामें श्री. दासगणु पहात. मिरवणुकी, कुस्त्यांचा कार्यक्रम वगैरे कामें श्री. तात्या पाटील

रहात. श्री. दासगणूंबरोबर त्यांचे निजामींतले धनिक भक्तही या उत्सवाला येत व जातीनें मेहनत करीत.

उत्सव दशमीला संपत नसे. बरीच मंडळी चैत्र शुद्ध पौर्णिमेला हनुमानजयंती पर्यंत शिरडीलाच रहात व तो उत्सव करून मग घराकडे वळत.

सन १९२७ चे रामनवमीला श्रीनरसिंहबावा पांचलेगांवकर हे बाल-साधु शिरडीला आले होते. त्यांच्या अंगच्या अलौकिक सामर्थ्याची प्रचीति अनेक साईभक्तांना पहावयाला मिळाली. इ. स. १९२८ सालींही ते रामनवमीला शिरडीस आले होते.

सन १९३४ सालीं या उत्सवांत श्री. दासगणूंनीं एक नवीन उपक्रम सुरू केला. तो म्हणजे श्रीगोदावरीच्या कावडी भरून आणून त्या पाण्यानें बाबांचे समाधीला स्नान घालावयाचें. नवमीचे दिवशीं पहांटे उठून मंडळी गोदावरीवर जात व तेथून कावडी भरून सकाळीं ८ चे सुमारास शिरडीचे ओढ्यावर येत. तिथून त्यांची वाजत गाजत मिरवणूक निघे, ती समाधिमंदिर व द्वारकामाई ( मशिद ) यांना प्रदक्षणा घालून पुनः समाधि-मंदिराचे प्रवेश-द्वाराशीं येई. तेथें गंगापूजन होऊन मग मंदिरांतील तसबिरीची गंगोदकानें पूजा होई व मग सर्व कावडींतील गंगोदकानें समाधीला स्नान घालीत. थोड्या फार फरकानें हा कार्यक्रम तेव्हांपासून चालू आहे. या कार्यक्रमांत सर्व जाति भाग घेतात.

सन १९३७ सालचे सुमारास संस्थानकमिटींत मतभेदाचें वारें खेळूं लागलें. तेव्हां कांहीं काळ या उत्सवाला थोडी उतरती कळा आली होती. वर्गणी पुरेशी जमत नसे, त्यामुळें कुस्त्यांचा कार्यक्रम कमी प्रमाणांत आला होता. उत्सवांतील ५ दिवसांत बाबांच्या पेट्यांतील येणारी रक्कम कुस्त्यांसाठीं खर्च करावयाची, व जास्त रक्कम लागल्यास गांवांत वर्गणी करून जमवावयाची अशी पद्धत होती. निमंत्रणपत्रिका पाठविणें, उत्सवाचा प्रसाद पाठविणें वगैरेंचा खर्च उत्सव करणारावर न पडतां कमिटीनें करावा अशी श्री. दासगणू यांनीं मागणी केली. त्याप्रमाणें पुढें हा उत्सवाची मुख्य जबाबदारी संस्थानकमिटीवर व कमिटीतर्फे श्री. दासगणू यांनीं उत्सव करावयाचा असें ठरून उत्सवाच्या निमंत्रणपत्रिका वगैरे कमिटीमार्फत चिटणीस यांच्या सहीनें जाऊं लागल्या. सन १९३९ मध्यें लढाई सुरू होऊन अन्ननियंत्रण झाल्यामुळें आणि भक्तांची बेसुमार वाढ झाल्यामुळें सर्व कामें सुरळीत व्हावीं म्हणून उत्सवाचा सर्व व्यवहार कमिटीच पाहूं लागली.

हल्लीं उत्सवाचा कार्यक्रम चैत्र शु॥ ८ मी पासून सुरू होतो. त्या दिवशीं कीर्तन, पालखीची मिरवणूक वगैरे कार्यक्रम होतात; नवमीला पहांटेपासून समाधीवर अभिषेक पूजा, अर्चा वगैरे सुरू होतात. त्यानंतर मागें लिहिल्याप्रमाणें कावडींचें गंगापूजन होऊन समाधीला गंगास्नान होतें. नंतर समाधीवर वस्त्रें, फुलें वगैरे अर्पण होतात. ११ वाजतां सभामंडपांत रामजन्माचें कीर्तन उभें रहातें. रामजन्म झाल्यावर नेहमींची दुपारची आरती होते. नंतर तीर्थप्रसाद, भोजन वगैरे कार्यक्रम होतात. सायंकाळीं निशाणांची व रथाचें

मिरवणूक निघते. रात्रीं संदल निघून शोभेची दारू उडविण्यांत येते. मग भक्तांच्या गायन-भजन वगैरेंच्या हजेऱ्या होतात. दशमीला कुस्त्यांचा फड होतो व विजयी खेळाडूंना बक्षिसें मिळतात. समाधीवर अभिषेक, पूजा, अर्चा वगैरे कार्यक्रम होऊन दुपारीं व्याख्यान, प्रवचनें वगैरे कार्यक्रम होतात. रात्रीं कीर्तन होतें. कधीं कधीं नाटकाचे प्रयोगही होतात. भारुड हा ललितासारखा एक खेळाचा प्रकार आहे, त्याचा कार्यक्रम होतो. एकादशीला भजनादि कार्यक्रम मोठ्या प्रमाणांत होऊन द्वादशीला दुपारीं काल्याचें कीर्तन होऊन उत्सवांची समाप्ति होते. ज्यां भक्तांना सवड असेल ते पौर्णिमेपर्यंत शिरडीस राहून श्रीहनुमान-जन्माचा उत्सव साजरा करून मग घराकडे परततात. हल्लीं भोजनबंदीचे कायद्यामुळें पूर्वीप्रमाणें उत्तमोत्तम भोजनाच्या पंक्तीवर पंक्ती उठत नाहींत; तरी पण इतर सर्व कार्यक्रम शक्य तितक्या उत्साहानें केले जातात. देशांत सुबत्ता होऊन बाबांना प्रिय असणारें अन्नसंतर्पणही पुनः मोठ्या प्रमाणावर सुरु करण्याची शक्यता बाबांनीं लवकरच घडवून आणावी, हीच बाबांच्या चरणीं प्रार्थना.

सन १९४१ सालीं या उत्सवांत थोडा व्यत्यय आला. त्या वर्षी शिरडींत कॉलरा चालू असल्यामुळें बाहेरील भक्त-मंडळीला शिरडीस येण्याला सरकारी हुकमानें बंदी झाली; हा बंदी हुकूम उत्सवापूर्वी दोनच दिवस जाहीर झाला ह्यामुळें कांहीं भक्तमंडळींना शिरडीपर्यंत येऊन परत जावें लागलें. अर्थात् संस्थान कमिटी व ग्रामस्थ मंडळींनीं उत्सव साजरा केला.

सन १९४५ सालीं कांहीं कारणामुळें ह. भ. प. श्रीदासगणू यांनीं श्रीरामजन्मोत्सव श्रीसमाधिमंदिरांत न करतां श्री. बाबूराव बोरावके यांचे घरीं साजरा केला. मंदिरांत कमिटी-तर्फे नेहमींप्रमाणें उत्सव झाला. त्यां सालीं कीर्तन संस्थानचे गवई श्री. विठ्ठलराव मराठे यांनीं केलें. यांच सालीं रामनवमीपूर्वी शिर्डीच्या आसपास कॉलऱ्याची साथ होती म्हणून उत्सवापूर्वी येणाऱ्या इसमास संस्थाननें त्यावेळीं खास ठेवलेले डॉ. चितळीकर का. प्रति-बंधक लस टोंचीत असत. रामनवमी दिवशीं सरकारी हुकूम येऊन उत्सवास येणाऱ्या मंडळीस बंदी झाली त्याचप्रमाणें कुस्त्या वगैरेही बंद करणें भाग झालें.

वरील एक साल सोडलें तर सन १९१५ पासून आजपर्यंत श्री. दासगणूंची सेवा श्रीसाईबाबांचे चरणीं या उत्सवाप्रीत्यर्थ चालू आहे. श्रीसाईबाबा त्यांचे मनोरथ पूर्ण करीत.

हा उत्सव श्रीबाबांचे कृपेनें असाच उत्तरोत्तर चढत्या वाढत्या प्रमाणांत होत राहावा हीच त्यांचे चरणीं प्रार्थना !

स्थापना : १९३१

देवाधिदेव—राजा इंद्रानें........

यौवनसुंदर मेनकेनें........

आपल्या आयुष्यांत केलेल्या पापाचें क्षालन करण्याकरितां

**गुरुपूजन केलें होतें**



आपणसुद्धां गुरुपूजनानें

पावन व्हा !

आमच्या दुकानांत

**साईबाबांच्या**

सोन्या—चांदीच्या सुंदर मूर्ती—
आंगठ्या—लॉकेट्स, फ्रेमसहित
फोटो वगैरे आपणांस मिळतील.
आपण त्या खरेदी करून गुरुदर्शनानें
आपल्या इच्छा सफल करून घ्या.

वि. सू.—आमच्याकडे सर्व प्रकारचीं पूजेचीं चांदिचीं भांडीं, देव्हारे, फोटोफ्रेम तयार मिळतात. शिवाय ऑर्डरप्रमाणें गिऱ्हाइकाच्या पसंतीप्रमाणें तयार करून देऊं.

# ई. आर. मालपेकर

जितेकर चाळ, ठाकुरद्वार रोड, मुंबई २

# साईबाबांचें भक्तप्रेम

लेखिका:—रंगू आत्माराम चाळकर

सोबतचा अनुभव एल्फिन्स्टन कॉलेजचे प्रा. जी. व्ही. भागवत यांचे मार्फत आमचेकडे पाठविण्यांत आला आहे. या अनुभवांत उल्लेखिलेली बाबांचीं पावलें पाहाण्यास आमचे प्रतिनिधि गेले होते. श्रीमती चाळकर यांचा अनुभव चिंतनीय वाटेल म्हणून मुद्दाम देत आहों. —संपादक

माझी माऊली साईबाबा फार कनवाळू आहे, अनाथांची सावली आहे, तिला जर तुम्ही प्रेमयुक्त भावनेनें व श्रद्धेनें हांक मारलीत तर ती धांवून आल्या-शिवाय राहाणार नाहीं. तोच आलेला अनुभव मी तिचें बालक सांगतें. माझे हे वेडेवांकडे बोल तुम्ही ऐका.

मीं त्यांच्या पोथीचें पारायण दोनतीन वेळां केलें. साईबाबा आले होते तेव्हां पारायणाची दुसरी वेळ होती. सातव्या दिवशीं त्यांच्या पोथीचे ५२ अध्याय संपवून बाबांचा नैवेद्य तयार करण्यांत गुंतलें असतांना मला दुपारचे अडीच वाजले. त्या दिवशीं मंगळवार होता. त्या दिवशीं बाबा आले नाहींत. मीं फार वाट पाहिली; मनांत फार कष्टी झालें. तो दिवस जाऊन बुधवार उगवला. बाबांचा धांवा मी करीतच होतें. ते कां आले नाहींत या चिंतेनें व्याकुळ होऊन; 'बाबा माझें काय चुकलें म्हणून तुम्ही येत नाहीं?' असें म्हणून कळकळीनें, प्रेमानें सद्गदित होऊन बाबांचा धांवा केला. ती माझी माऊली माझ्या हांकेला धांवून आली व अंगणांत उभी राहिली. तुम्ही म्हणाल कीं, बाबा अंगणांत कां उभे राहिले, समोर म्हणजे देवखोलींत कां आले नाहींत? परंतु, माझी अजून त्यांना परीक्षा पहावयाची होती. खरोखर काय तें तेज! त्यांना पाहिल्याबरोबर मी त्यांचे पुढें जाऊन उभी राहिलें आणि गहिंवरून, 'बाबा!' म्हणून रडूं लागलें. त्यांचे दोन्ही हात धरून हळूहळूं त्यांना पायऱ्यांवरून घरांत आणतांना त्यांना सुद्धां प्रेमाचें भरतें येऊन ते जोरजोरानें कांपूं लागले. पहा कशी माऊली प्रेमाची भुकेली आहे! पायरीवरून वर येतांना ते इतके जड झाले कीं एखाद्या वज्राप्रमाणें! तरी पण मी त्यांचे हात सोडले नाहींत. नंतर थोड्या अंतरावर जातों तों ते इतके हलके झाले कीं दोन तीन महिन्यांच्या मुलाप्रमाणें! घरांत येतांना मला हिंदी भाषेंत म्हणतात, 'मला दक्षणा देशील? कायमची देशील?' मीही त्यांच्याबरोबर हिंदी बोलत होतें, 'बाबा तुम्हांला सर्व देईन.' ते पूर्ण समजले कीं मला बालकानें ओळखिलें

आहे. त्यांना पाटावर बसण्याचा आग्रह केला. ते बसले. त्यांची पूजा केली. दक्षणा दिली. रुमाल दिला, आरती केली. माझें शिर त्यांच्या चरणावर ठेवून त्यांच्या हातांत नारळ दिला. मक्काचे एक फोड दिलें. मग नंतर नैवेद्याचें ताट आणून त्यांच्यापुढें ठेवून त्यांना प्रार्थनापूर्वक खाण्याबद्दल आग्रह केला. माझ्या माउलीला मीं थोडा लाडू माझ्या हातानें खाऊं घातला. नंतर सर्व फराळ खाण्यास माझ्या माउलीनें सुरवात केली व सर्व थोडें थोडें खाऊन माझी माउली आनंदित झाली. नैवेद्याच्या ताटांत फक्त भात नव्हता. रात्रींचा भात कसा वाढायचा ह्या कल्पनेनें मीं तो बाजूला काढून ठेवला होता. आतां वाटतें, माझ्या माउलीनें तोसुद्धां खाल्ला असता. कारण देव भावाचा भुकेला आहे. तो प्रकार पुढें सांगतें. खाणें झाल्यावर त्यांची पोथी तुळशीपत्रासहित त्यांच्या हातांत देऊन ती मी परत मागूं लागले. तेव्हां ते मी पोथी घेऊन जातों असें म्हणाले. परंतु मी त्यांना, माझ्याजवळ असूंदे, मला ती नेहमीं हवी असें म्हणालें. आठ आणे त्यांच्याजवळून त्यांच्या हातून मागून घेतले. माझ्या पोथीवर अजून मी ते पुजतें. नंतर ते, 'आतां मी जातों बेटा' असें म्हणाले. पण मीं त्यांना आमच्या देवखोलींत चलण्याबद्दल सांगितलें व त्यांचा हात धरून त्यांना देवखोलींत नेलें. तेथें बाबांचा एक फोटो आहे. (त्याची मी रोज पूजा करतें) तो पाहून ते म्हणाले, 'हा फोटू कुणाचा?' मी म्हणालें, 'बाबा, तुमचाच आहे.' पहा, अजून ते माझी परीक्षा पहातच आहेत. नंतर ते, 'हरिद्वार, बद्रिकेदार, रामेश्वर व नंतर शिरडी,' असें म्हणत बाहेर पडले. आतां पूर्णपणें हे बाबाच आहेत असें मीं जाणलें. जातांना, त्यांचें एक पाऊल आमच्या दारांत व दुसरें ते जेवले तेथें, अशीं दोन पाउलें आमच्या घरांत उमटलीं आहेत. हा एक चमत्कार आहे. हें पहाण्यांस सर्व गांव लोटलें. पुरुष, बायका, मुलें ह्यांची ही गर्दी झाली. ज्यांना पहावयाचें आहे त्यांनीं दर्शनास यावें, अजून तीं पाउलें सुरक्षित आहेत. त्यांनीं मला एक फोटोसुद्धां दिला असून तो फार तेजस्वी आहे. असो. त्यानंतर पायऱ्या उतरून खालीं अंगणांत गेल्यावर त्यांनीं मागें वळून पाहिलें. मीं मनांत म्हटलें की बाबा मागें वळून काय पहातात? त्याचें कारण पुढें सांगतें. माझी आई वगैरे कोणी येथें नाहीं. मी व माझे दोन लहान भाऊ असे राहातों. बाबांच्या मागोमाग मीं पण गेलें. ते आमच्या शेजारीं जाऊन त्यांच्या अंगणांत उभे राहिले. पण त्या लोकांना बाबांची पारख झाली नाहीं. त्या लोकांची बाबांवर फार भक्ति होती, तरी पण त्या लोकांना परीक्षा झाली नाहीं. मी आड्न पहात होतें. ते दुसऱ्या घरीं गेले. तेथें पण तोच प्रकार. मग बाबांना माझी चाहूल लागली. ते इकडे तिकडे पाहूं लागले. नंतर मी त्यांच्यासमोर जाऊन उभी राहिलें. ते म्हणाले, 'बेटा मंदिरला जा.' तुम्ही म्हणाल, 'मंदिर कोणतें?' मंदिर म्हणजे आमचें घर. मीं त्यांच्या आज्ञेवरून मागें परतलें. नंतर ते आमच्या गांवातल्या देवळांत गेले व तेथील पुजाऱ्यास म्हणाले, 'तुझ्या खिशांतील मला दोन आणे दे.' पुजाऱ्यानें दोन आणे दिले. तुम्हीं म्हणाल कीं बाबा पैसे का मागतात? त्यांना कमी आहे असें नाहीं, तर ते भक्तांची परीक्षा पहातात. ते गांवांत जास्त राहिले नाहींत. पाऊण तासांत ते परतले. मी त्या वेळीं ताज्या भाताचा नैवेद्य वाढून सद्गुरूंच्या फोटोपुढें बसलें व प्रार्थना केली, 'बाबा, तुम्हीं सर्व पक्वान्नें

खाल्लींत पण तुम्हीं माझा वरणभात जेवलां नाहींत. मीं वाढला नाहीं ही माझी मोठी चूक झाली. आतां या कसे.' इतकें म्हणून मी हातानें तुळशीची माळ करत बाहेर येऊन रस्त्यांत पाहूं लागलें; तर खरंच, मांझी माउली उभीच! मी लगबगीनें खालीं आलें व म्हणालें, 'बाबा, चला ना खाणें खायला.' तेव्हां ते म्हणाले कीं, मला गाडीला जावयाचें आहे. मी म्हणालें कीं तुम्हांला गाडी मिळेल. नंतर हळूहळू त्यांना परत घरांत आणून त्यांच्या चरणावर तुळशीची माळ अर्पून, माझें मस्तक पायांवर ठेवून त्यांना पाटावर बसवून, नैवेद्य आणून त्यांच्या पुढें ठेवून त्यांना जेवणाचा आग्रह करतांच ते जेवूं लागले. तुम्हीं म्हणाल कीं, बाबा कितीदां जेवावयास येतात. पण माझा भाताचा नैवेद्य राहिलेला तो ते जेवले. नंतर मी त्यांच्याकडे प्रसाद मागूं लागलें. त्यांनीं थोडा वरणभात माझ्या हातावर ठेवला, माझ्या भावजयीला दिला व थोडा प्रसाद ठेवून त्यांनीं हात धुतले. बघा कशी माझी माउली प्रेमाची भुकेली आहे! तुम्हीं सर्वांनीं माझ्यां माउलीवर प्रेम करा; ती सर्वांबरोबर प्रेमानें वागेल. तिजवर श्रद्धा ठेवा, ती सर्वांवर कृपा करते. असो. आतां तुमच्या लक्षांत येईल कीं, बाबांनीं मागें कां पाहिलें; कारण त्यांना परत यावयाचें होतें. जेवून उठल्यावर ते पाणी प्याले. माझी वहिनी कांहीं तरी आणण्यास घरांत गेली. तेव्हां ते म्हणाले, 'या बाईकडील मला एक चादर व सव्वा रुपया- दक्षणा पाहिजे.' मीं म्हटलें कीं, बाबा मघां तुम्हांला दक्षणा दिली. ते बोलले कीं देवाला झालर करण्यास पाहिजे; ते तिनें दिले; त्यांना तांदूळ दिले. नंतर ती आंत गेली तेव्हां मीं त्यांना म्हटलें, 'बाबा, मी तुमचें बालक आहे, मला कांहीं तरी आशीर्वाद द्या.' ते हंसून म्हणाले, 'तुला आशीर्वाद कशाला? तुझें सर्व चांगलें आहे, याच्यापुढें तूं सर्व चांगलें करशील.' इतकें बोलून माझी माउली जाण्याच्या तयारीला लागली. त्यांच्या मागोमाग मी पाहूं लागलें. सातआठ पावलांत माझी माऊली दिसेनाशी झाली. हें सर्व लिहितांना माझ्या अंगावर रोमांच उभे राहातात व काय होतें तें सांगतां येत नाहीं. माझी माउली केव्हां परत मला भेटेल याची सारखी मी वाट पहात असतें. त्यांनीं मला एक फोटो दिला आहे. ज्यांना पहाण्याची इच्छा असेल त्यांनीं पहावयास यावें. पुष्कळ मंडळी माझ्या माउलीला पहावयास आमच्या घरीं येतात. माझी माउली माझ्या स्वप्नांत येऊन मला भेट देते व कांहीं तरी खाण्याचे पदार्थ मागते. अशी माझी माउली भावाची भुकेली आहे. आपण सर्वांनीं प्रेमानें, श्रद्धेनें, कळकळीनें प्रार्थना करा; ती धांवून आल्याशिवाय व भेटल्याशिवाय राहाणार नाहीं. ही माझी अनाथ बालकाची विनंति आहे. इतकें सांगून मी बाबांची आज्ञा घेऊन पुरें करतें.

साईबाबा महाराज की जय!

---

—ज्याला भक्तिमार्गाचा अवलंब करावयाचा असेल त्यानें निर्गुणाचें आणि अभेदाचें वेड बाळगून चालणार नाहीं................

# भक्ति

: लेखक :
विद्वद्रत्न डॉ. रामचंद्र प्रल्हाद पारनेरकर पीएच्. डी. जव्हेरी

घड्या ज्या वस्त्राच्या रजक परिमार्जीत तितुक्या ।
जळस्पर्शे होती वरिल घडिनें शुद्ध तितुक्या ॥
तशासाठीं मध्यें हरिभजनही ज्या घडि घडे ।
तयाच्या संसर्गे सकळ घडियांचा मळ झडे ॥

—वामनपंडित

माणसाला ईश्वरभक्तीची उपरतीदेखील ईश्वराच्या कृपेशिवाय होत नाहीं. एकदां उपरति झाली म्हणजे कृपा झालीच असें समजण्यास मुळींच प्रत्यवाय नाहीं. पण केवळ उपरति झाली म्हणजे साराच परमार्थ संपला असें नाहीं, तर तेथूनच परमार्थाची वा ईश्वरभक्तीची खरीखुरी सुरवात आहे.

एकदां ईश्वरकृपेची तळमळ माणसाला लागली कीं, तेव्हांपासूनच तो दिवसेंदिवस अधिकाधिक अधीर होत जातो. अजून आपणावर देवकृपा कां होऊं नये अशा विचारानें त्याचे डोक्यांत काहूर उठतें, आणि गतजीवनांचा चित्रपट झरझर त्याचे डोळ्यासमोरून जाऊं लागतो. त्यांतील कितीतरी प्रसंग त्यास, आपण खरोखर ईश्वरी कृपेला पात्र आहोंत का, असा मनांत संदेह निर्माण करून भेडसावूं लागतात. अशा देवकृपेसाठीं अधीर झालेल्या, पण स्वापराधाच्या जाणिवेनें भयग्रस्त व स्तिमित झालेल्या साधकांस वामनपंडितांसारखे महानुभावी वरील उदाहरणानें अभय देतात. वामनपंडितांचा काळ अति सोंवळ्या–ओंवळ्याचा होता. त्यांनीं नित्य परिचर्यातील एक उदाहरण घेऊन साधकांस अभयप्रदान केलें आहे. आजच्या काळांत, वर उदाहरणादाखल सांगितलेली पद्धति आपल्या मुळींच परिचयाची राहिली नाहीं.

असो, वामनपंडितांचें म्हणणें असें कीं, परिटाकडून धुऊन आलेल्या कपड्यांचे वरील घडीवर पाणी शिंपडल्यानें जशा खालील सर्व घड्या शुद्ध होतात त्याप्रमाणेंच ज्या घडीला माणसाकडून हरिभजन घडतें त्या घडीपासून मागच्या सर्व घड्या पावन होतात. तात्पर्य, माणसानें जेव्हांपासून ईश्वरभक्ति सुरू करावी त्यापूर्वीच्या कालाचा

विचार करण्याचें त्याला प्रयोजन उरत नाहीं. मागील त्याचें जीवन कसेंही असलें तरी तें पावन होऊन जातें. गतजीवन कुणाचें कसेंही असलें तरी जो कोणी ईश्वरभक्ति करूं लागेल तो ईश्वरकृपेस पात्रच ठरतो. ईश्वरकृपेसाठीं तळमळणाऱ्यांना पंडितांचें हें केवढें अभयदान आहे!

पूर्वचरित्र कलंकित असून भक्तीनें भगवत्कृपापात्र झालेल्यांचीं उदाहरणें थोडीं थोडकीं नाहींत; उदाहरणार्थ वाल्या कोळी, कान्होपात्रा इ० इ०. तरी देखील भक्ति करूं लागल्यावर पूर्ववत् वर्तन ठेवणें योग्य होईल का अयोग्य हा एक प्रश्नच आहे.

भक्तीला भावडी म्हणतात हें खरें! पण भक्ति करणाऱ्यानें करावयच्या भक्तीविषयीं भावडें राहून मुळींच भागत नाहीं. भक्तीचें एक स्वतंत्र शास्त्रच आहे. त्या शास्त्राचे प्रणेते श्री नारदमुनी होत. ह्या शास्त्रानुसारें, तुम्ही कराल ती भक्ति निर्दोष असल्यास देवकृपा निश्चितच व्हावयाची. पण ह्याचा अर्थ असा नव्हे कीं, जो हें भक्तिशास्त्र अभ्यासील त्यावरच देवकृपा होईल. तुम्ही समजून उमजून म्हणजे भक्तीचें शास्त्र अभ्यासून भक्ति करा अथवा न समजतां भावडेपणानें पण शास्त्रदृष्ट्या निर्दोष अशी भक्ति करा देवकृपा होईलच. आणि म्हणूनच भक्तीला भावडी असें म्हणतात.

ज्ञानमार्गांत असें चालत नाहीं. अपरोक्षानुभूतिपूर्वक (म्हणजेच प्रत्यक्षानुभूति-पूर्वक) जें तर्कशुद्ध परोक्ष ज्ञान म्हणजे वस्तुविषयींचें यथार्थ ज्ञान लागतें तें जर नसेल तर मुमुक्षु हा कधींच सिद्धदशेप्रत पावत नाहीं. अपरोक्षानुभूतींत, परोक्ष ज्ञानाचा पुढें जरी अभाव असला तरी सुरवातीस त्याचा अभाव खपत नाहीं. साधकास परोक्ष ज्ञान नसेल तर तो अपरोक्षाचा अधिकारीच ठरत नाहीं. आणि म्हणूनच ज्ञानास डोळस म्हणतात. आपणांस येथें ज्ञानाचें डोळसपण नको आहे, तर भक्तीविषयींचें डोळसपण हवें आहे. भक्ति करणाऱ्या भक्ताकडून न कळत पण अगदीं सहजच जर निर्दोष भक्ति घडत असेल तर त्याच्यासाठीं कोणताच प्रश्न उरत नाहीं. पण सहज वाटणाऱ्या भक्तींत सहज निर्दोषता नसेल तर भक्ताचा जो हेतु परमेश्वरकृपा तो साध्य होत नाहीं. एतदर्थ भक्तांस देवाविषयीं वाटणाऱ्या सहज भक्तीचें निर्दोष स्वरूप काय आहे हें समजावून घेणें परमावश्यक आहे. कारण भक्तानें जरी स्वतःस भावडा म्हणविलें तरी देव स्वतःस कधींच भावडा म्हणवीत नाहीं.

'ये यथा मां प्रपद्यन्ते तांस्तथैव भजाम्यहम्' असें देव म्हणतो. स्वतः देव जर भावडा नाहीं तर त्याचा भक्त भक्तीविषयीं भावडा राहून कसें चालेल?

'कृपाळूपणें अल्प धारिष्ट पाहे' देव भक्ताची परीक्षा पहात असतो. ही गोष्ट प्रवैश्रुतच आहे. तेव्हां भक्ती करून भगवत्कृपेस पात्र झालेल्या भक्तांनीं जे भक्तिदोष म्हणून सांगितलेले आहेत ते जाणून घेऊन नाहींसे करणें हें साधकाचें प्रथम कर्तव्य ठरतें आणि भक्तिगुण म्हणून जे प्रतिपादिले आहेत त्यांची माहिती मिळवून ते अंगीं बाणणें व असल्यास ते वाढीला लावणें हें भक्तिमार्गांत नव्यानें पदार्पण करणाऱ्याचें दुसरें कर्तव्य आहे.

यावन्नानुग्रहः साक्षाज्जयते परमेश्वरात्
तावन्न सद्गुरुं कश्चित्सच्छास्त्रमपि नो लभेत् ॥
॥ योगवासिष्ठ ॥

पण येथेंही शेवटीं ' बुद्धिदाता भगवान ' असेंच म्हणावें लागतें. कारण भ मार्गांतील माझ्या आजवरच्या अनुभवाप्रमाणें असे कित्येक करंटे जीव माझ्या पहाण्य आले आहेत कीं जे, स्वतःचा अज्ञानजन्य मताभिमान सोडण्यास तयार नसल्यामुळें मानेल तशी ईश्वरभक्ती करण्याचे निष्कारण सायास करीत असतात. केवळ स्व हेकटपणामुळें तीस चाळीस वर्षें ह्या मार्गांत राबून देखील हे ईश्वरकृपेपासून व राहतात. अशा हेकटांचा आणि अहंगंड असणाऱ्यांचा वाली केवळ परमेश्वरच. हे प्रचीतीला विन्मुख राहतात ही जेवढी वाईट गोष्ट आहे त्याहीपेक्षां अधिक दुःखद म्हणजे ह्यांच्या करंटेपणाचे उदाहरणामुळें अन्य जनांस या मार्गाविषयीं संदेह नि होतो आणि नवे लोक गलितधैर्य होतात. नाइलाजास्तव अथवा बुडत्यास का आधार म्हणून ' अनेकजन्म संसिद्धिः ' या वचनाचा शेवटीं आश्रय घेणें निराळें. प मार्गांत पदार्पण करणाऱ्या प्रत्येक भाविकाचा तुकाराममहाराजाप्रमाणें ' याच देहीं डोळां ' असा संकल्प आणि निश्चय असणें परमावश्यक आहे. असा जर भाविकाचा साधकाचा पक्का निश्चय होईल तर-भक्तशिरोमणी तुकाराममहाराज म्हणतात—

निश्चयाचें बळ तुका म्हणे तेंचि फळ ॥
भक्तिभक्ति सब कोऊ कहे भक्ति न जाने कोय ॥
'दादु'भक्ति भगवंतकी देह निरंतर होय ॥१॥

उत्तर हिंदुस्थानांत दादू नांवाचे ईश्वराचे परमभक्त होऊन गेले. ते म्हणतात भक्ति म्हणणारे सर्वच असतात पण भक्ति म्हणजे काय हें जाणणारा वा खरी करणारा कोणचि असत नाहीं. अर्थात् यावरून एक गोष्ट सिद्ध होते ती ही कीं, मार्ग हा एक शास्त्रोक्त मार्ग आहे, मनसोक्त नाहीं.

ज्याप्रमाणें भक्तिमार्गांत हेकडपणा खपत नाहीं त्याप्रमाणेंच अधीरपणा व । उ पणा ठेवूनही भागत नाहीं. ' तुका म्हणे नाहीं चालत तांतडी । प्राप्त काळ आल्यावीण ' ' Learn to labour and to wait ' हें तत्त्व या मार्गांतही अवलं लागतेंच. त्याशिवाय गती नाहीं. तहान लागल्यावर आड खोदून चालत नाहीं म्हणूनच प्रत्येकास बालपणापासून कांहींतरी साधनभक्ति लावण्याची आपली पूर्व आहे. ती परंपरा दिवसेंदिवस लुप्तप्राय होत आहे ही गोष्ट खरोखरीच खेदाची आहे.

भक्तिचे दोष जे तीन्ही । ते अन्यत्वाचि आश्रित ।
तिचेच तीन्ही गुण ते । अन्यत्वाच त्रतता ॥१॥
निमित्तें, व्यवधानत्वें, । व्यभिचारें करोनिया ।
सनिमित्ता, व्यवहिता । व्यभिचारिणि भक्ति ते ॥२॥

निमित्तें भक्तिमुक्तीच्या । सनिमित्ताचि भक्ति ते ।
व्यवधान क्षण जरी । तरी व्यवहिताचि ते ॥३॥
कल्याण नसतां शीघ्र । क्षण एकहि नावडी ।
उपजे ते व्यवहिता । व्यवधानें क्षणाचिया ॥४॥
रमे दो पुरुषीं नारी । ते जशी व्यभिचारिणी ।
देवीं, स्वजीवीं दो ठायीं । भक्ति ही व्यभिचारिणी ॥५॥
हे दोष अन्य भक्तींचे । आतां याचें विलक्षण ।
अनन्य भक्तिचे तीन्ही । गुण ते आइका असे ॥६॥
सर्व प्रियें ज्यानिमित्तें । प्रिय जो निमित्तची ।
तो स्वात्मा होय विश्वात्मा । अनिमित्ताची भक्ति ही ॥७॥
उपासकाचा जो आत्मा । तो उपास्यपणें स्फुरे ।
तेंव्हां अव्यवहिता भक्ति । की जी ना विटे कधीं ॥८॥
ज्या आत्म्यार्थ उपास्याची । करी भक्ती उपासक ।
त्यासि स्वपेक्य कळतां । भक्ति अव्यभिचारिणी ॥९॥

वर वामनपंडितांनीं दर्शविल्याप्रमाणें भक्तिशास्त्रदृष्ट्या सनिमित्ता, व्यवहिता व भिचारिणी असे सदोष भक्तीचे तीन प्रकार वा हे भक्तीचे तीन दोष आहेत. पण या तीन दोषापेक्षां अधिक हानिकारक असे कांहीं दोष माझे अवलोकनांत गेल्या कांहीं र्यांच्या अनुभवांत आले आहेत. त्यांपैकीं एका महत्त्वाच्या दोषाविषयीं मी लिहीत आहें. कीच्या विषयीं पुन्हां केव्हां तरी लिहीन.

आज भक्त म्हणविणाऱ्या लोकांस तत्त्वज्ञानाचें यथार्थ ज्ञान असत नाहीं. त्यामुळें ईश्वरतत्त्व श्वरतत्त्व व ब्रह्मतत्त्व हीं दोन स्वतंत्र तत्त्वें आहेत हें. त्यांना माहित नसतें. थोडासा वेदांत तत्त्व त्यांनीं वाचला वा ऐकलेला असतो. त्यामुळें भक्तीचें साधन परारून व केवळ ळ अज्ञानामुळें ईश्वरावर ब्रह्मत्वाचा आरोप करून, तो निर्गुण निराकार आहे अशी त्यांचे विषयींची त्यांची विपरीत भावना असते. यामुळेंच त्यांचें भक्तीचें पाऊल पुढें पडत नाहीं. श्रीमदाद्यशंकराचार्य देखील ईश्वरास करता करविता सगुण साकार मानतात व त्याची भक्ति प्रतिपादितात, आणि ब्रह्मप्राप्तीचें साधन ज्ञान सांगतात. पण सध्यां परमार्थी म्हणविणारांनीं सगळाच घोटाळा करून ठेवला आहे.

Only love for the supreme Lord is true Bhakti. Love for any other being however great, is not Bhakti. The Supreme Lord here means Isvara, the Eternal, the Parp, the all merciful the all mighty, the ever-free, the all knowing, the Teacher of all teachers, the lord who of his own nature is inexpressible love.—Swami Vivekananda.

'ईश्वरी जे अनन्यप्रीती । तेचि जाण विमल भक्ति ।
तेणें आभारें विश्वमूर्ति । सर्वेश्वरू तो ॥' (रंगनाथी योगवासिष्ठ)

वरील विवेकानंदाचें व्याख्यान वा रंगनाथांचे वचन यावरून आपणास हें स्पष्ट होतें कीं, भक्ति म्हणजे अखिल ब्रह्मांडनायक, या जगाचा नियंता त्याचेवरील निस्सीम प्रेम म्हणजेच भक्ति. निर्गुण, निराकार, अकर्त्या ब्रह्मतत्त्वाची आसक्ती म्हणजे भक्ति नव्हे."

भक्तिमार्गानें जाणाऱ्या भगवद्भक्तानें, तुकाराममहाराजाप्रमाणें अतिशय उदास, किंबहुना बेपर्वा असावयास पाहिजे. भक्तीचें हें फारच मोठें पथ्य आहे. 'नलगे ब्रह्मज्ञान, आम्हां विष्णुदासा ' ईश्वरतत्त्वाचें वैदिक नांव विष्णुतत्त्व असें आहे. वेदांत ब्रह्मतत्त्वास 'शिवतत्त्व' म्हणतात.

भक्तिमार्गाचें अवलंबन करून ब्रह्मज्ञानाचे पोवाडे गाणाऱ्या भक्तावर ईश्वरी कृपा होणें तर कालत्रयीं शक्य नाहीं. पण भक्ति हें चुकीचें साधन ब्रह्मप्राप्तीकरितां पत्करल्यानें त्याचीही प्राप्ती होत नाहीं. असा साधक मध्येंच लटकत राहतो.

हरिसे कोई नहीं बडा दिवाने क्यों गफलतमें पडा ।
कहत कबीरा सुन माइ साधू । हरीचरण चित जडा ॥

ब्रह्मज्ञान ऐकून भक्ताचे ठिकाणीं जरूर विक्षेप उत्पन्न होतो. अशा भक्तास वा साधूस कबीरजी 'दिवाणा' म्हणजे वेडा म्हणतात व ठांसून सांगतात कीं, बाबा, ईश्वराशिवाय दुसरें कांहींही श्रेष्ठ नाहीं, तरी तूं आपलें चित्त त्याचे चरणीं लाव.

'यद्यपि भेदापगमे नाथ तवाहम्'. असें श्रीमदाद्य शंकराचार्य म्हणतात आणि म्हणून ईश्वराशीं सेव्यसेवक भावानेंच शरण जातात, त्याच्यावर निस्सीम प्रेम करतात, त्याची भक्ति करतात. त्यावेळीं ब्रह्मज्ञान ते स्वतः बाजूला ठेवतात. तेव्हां ज्याला भक्तिमार्गाचा अवलंब करावयाचा असेल त्यानें निर्गुणाचें आणि अभेदाचें वेड बाळगून चालणार नाहीं. हें वेड म्हणजे भक्तिमार्गांतील सर्वांत मोठा आत्मघातकी दोष आहे, तरी तो भक्तानें सोडला पाहिजे.

---


## श्रीसाईबाबा शिरडी संस्थानांत विक्रीस असलेलीं पुस्तकें.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| (१) | श्रीसाईसच्चरित | (मराठी) | किंमत रु. | ७-०-० |
| (२) | सच्चरित | (इंग्रजी) | ,, ,, | ४-०-० |
| (३) | दासगणूकृत श्रीसाईनाथ-स्तवनमंजरी | | ,, ,, | ०-२-० |
| (४) | ,, | (अध्याय ४) | ,, ,, | ०-८-० |
| (५) | सगुणोपासना | | ,, ,, | ०-३-० |
| (६) | प्रधानकृत पुस्तक | (इंग्रजी) | ,, ,, | १-०-० |

**वरील पुस्तकें खालील पत्त्यावर मिळतील:—**

(१) सर फांसकून, श्रीसाईबाबा शिरडी संस्थान,
पोस्ट–शिरडी, जि. अहमदनगर.

(२) श्रीसाईबाबा शिरडी संस्थान, मुंबई ऑफिस,
२५, बँक स्ट्रीट, फोर्ट, मुंबई १.

१–मज हृदयीं सद्गुरु। जेणें तारिलों हा संसारपूरू १–२२
२–पतिव्रतेचें हृदय जैसें। पतीवांचूनि न स्पर्शे ॥ १–१११
३–जैसा गजघटा आंत। सिंहलीला विदारित।
तैसा (घोष) हृदयातें भेदित। कौरवांचिया ॥ १–१६३
४–हृदयाचें ढिलेपण। एथ निफ्याति नव्हे कारण ॥ २–२८
५–जो आत्मबोधयुक्त। होऊनि असे संतत।
जो मातें हृदयांआंत। विसंबेना ॥ २–३१७
६–अभ्यासचि आपण यातें करी। हृदयातें अनुभव वरी ॥ ५–१६५
७–विषयांचा विसर पडे। इंद्रियांची कसमस मोडे।
मनाची घडी घडे। हृदयामाजीं ॥ ६–१८८
८–तरी मना बाहिरिलीकडे। येयांची सांविया सवे मे.
हें हृदयाचिया डोहीं बुडे। तैसें कीजे ॥ ८–१११
९–तरी सहजें मन कोंडलें। हृदयींची असेल उगलें।
जैसें करचरणीं मोडलें। परिवर न संडी ॥ ८–११३
१०–तैसा हृदयामध्यें मी राम। असतां सर्व सुखा
कां भ्रांतासी काम। विषयांवरी ॥ ९–६०
११–आतां इंद्रिया देऊनि कवाड। हृदयीं भोगीं ॥
१२–तेव्हां मनोंसी मनपण न स्फुरे। बुद्धि आपणपें न सांवरे।
इंद्रियांचे रश्मी माघारे। हृदयवरी भरले ॥ ११–१९१
१३–जीव परमात्मा दोनी। बैसले एकासनीं।
जयाचिया हृदयभुवनीं। विराजती ॥ १२–१५३
१४–श्रीगुरूचे पाय। जें हृदय गवसूनि ठाय ॥ १३–५
१५–कां आघवियाचि इंद्रियवृत्ती। हृदयाचिया एकांतीं
थापटूनि सुषुप्तिं। आणी जें गा ॥ १३–१३०
१६–आतां हृदय हें आपुलें। चौफळूनिया भलें।
वरी बैसऊं पाउलें। श्रीगुरूचीं ॥ १५–१
१७–येऱ्हवीं सर्वांच्या हृदयदेशीं। मी असुका आहे ऐसी।
जे बुद्धि स्फुरे अहर्निशी। तें वस्तु गा मी ॥ १५–४२१
१८–सर्व भूतांच्या अंतरीं। हृदय महा अंबरीं।
चिद्वृत्तीच्या सहस्रकरीं। उदयला असे जो ॥

इतके उतारे पुष्कळ झाले. यांतील आणि वरील (गीतेंतील) उतारे पहाता हृदय हा शब्द एका मोठ्या ---- अर्थी वापरलेला दिसतो. तो अर्थ कोणता हे आपण पाहूं.

डेक्कन कॉलेजांतील शास्त्रीय विषयांचे सेवानिवृत्त प्रोफेसर, ग. सं. दीक्षित, एम. ए.

त्यांनीं 'ज्ञानेश्वरीचें शास्त्रीय मंथन' नांवाचें एक पुस्तक लिहिलें आहे. त्यांत त्यांनीं हृदय याचा अर्थ असा दिला आहे कीं :—

'हृदय या शब्दाचा रक्ताशय ( Heart ) असा अर्थ नसून, मेंदूच्या तळा-कुडील, मानेंतील भाग—मानेजवळील भाग ( Little Brain ) कीं ज्याचेपुढें पोकळी आहे ( Fourth ventricle ) असा घेतला पाहिजे. ( पान, ३३, ५२, ६४, ६६, ७३, ७८ इत्यादि ).

शास्त्रीय विषयांवर उपयुक्त आणि मौलिक ग्रंथ लिहिणारे श्री. आनंदघनराम ( रामचंद्र विनायक कुलकर्णी ) हे आपल्या 'भयंकर संकटांतून सुटण्यांचे दोन मार्ग' या छोट्या पुस्तकांत ( पान २ ) असे लिहितात कीं:—

**हृदयस्थ** म्हणजे पुढच्या मेंदूच्या मध्यांत राहून मागच्या मेंदूच्या द्वारें शरीरांत सर्व ज्ञानानें व सामर्थ्यानें क्रिया करीत आहे असा जो तो.

या दोन्ही अर्थापेक्षां चांगला अर्थ श्री. रमण भगवान यांनीं आपल्या रमणगीता आणि रमणोपनिषत् ( उपदेशसार ) या ग्रंथांत सांगितला आहे.

'अन्यदेव ततो रक्तपिंडाद्धृदयमुच्यते।
अयं हृदिति वृत्त्या तदात्मनो रूपमीरितम्।

रमणगीता ५–५,

अर्थ—हें ( अध्यात्मिक ) हृदय शरीरांतील रक्तपिंडात्मक हृदयाहून निराळें आहे. येथें 'हृदय' ( हृत+अयं=हृदय हा अयं म्हणजे आत्मा ) या शब्दाच्या व्युत्पत्तीनें आत्मरूप सांगितलें आहे.

'तस्य दक्षिणतो धाम हृत्पीठे नैव वामतः।
तस्मात्प्रवहति ज्योति सहस्रारं सुषुम्नया॥ ५–६'

अर्थ—त्याचें स्थान छातीच्या उजव्या बाजूस आहे. डाव्या बाजूस ( रक्तपिंड आहे तेथें ) नाहीं. तेथूनच ज्योति - सुषुम्ना मार्गानें मस्तकांतील सहस्रदलकमलाकडे जाते.

'मी खात्रीनें सांगतों, शपथेवर सांगतों' असें जोरानें म्हणून मनुष्य छातीवर ( उजव्या बाजूकडे ) हात ठेवितो ती जागा हृदयाची. मानवाच्या सर्व वृत्ति जेथून उगम पावतात, त्याला हृदय असें म्हणतात. अहंवृत्ति ही सकल वृत्तींचें मूळ आहे. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे ही अहंवृत्ति जेथून उठतें तें हृदय. 'हा मनोमय एकदेशी अहंकार नाश पावल्यावर शाश्वत व परमपूर्ण असा हृत्स्वरूप अहंकार अहमहमिकेनें ( मी मी म्हणून ) स्फुरण पावूं लागतो' असें त्यांनीं उपदेशसार श्लोक २० यांत सांगितलें आहे.

हा श्रीरमणभगवानांचा अर्थ लक्ष्यांत ठेवून वरील उतारे आणि हृदय शब्द असलेले इतर उतारे यांचा अर्थ बरोबर लागतो,

**नमो भगवते श्रीसाई-रमणाय।**

# लोभी ब्राह्मणांचें गर्व हरण

— : संकलन : —

आमचे प्रतिनिधि

स्वतःस वेदशास्त्र 'पारंगत' समजणाऱ्या कांहीं कुंभकोणमच्या लोभी तेलंगी ब्राह्मणांचें गर्वहरण श्रीबाबांनी कसें केलें याबद्दलची एक आख्यायिका शिर्डी येथील संस्थान गवई श्री. विठ्ठलराव मराठे यांनीं एका कीर्तनांत सांगितली ती त्यांच्या परवानगीनें श्रीसाई लीलेच्या वाचकवृंदास माहिती व्हावी म्हणून खालीं देत आहों.

श्रीसाईबाबा हयात असतांना रोज खूप पैसे वाटीत असत ही गोष्ट सुप्रसिद्धच आहे. रोज किती पैसे वांटीत याचा नक्की आंकडा अर्थातच कोणास निश्चित सांगतां येणें शक्य नाहीं. परंतु कमींत कमी ७/८शें रुपये तरी वांटले जात असावेत असें बोललें जातें. त्यांचीं ही कीर्ति मुंबईस कांहीं तेलंगी ब्राह्मणांनीं ऐकली. हे ब्राह्मण कुंभकोणमचे होते व वेदशास्त्रांत पारंगत होते. गांवोगांवीं हिंडून, ब्राह्मणांच्या घरीं जाऊन, यजमानासमोर वेदांतील मंत्रांच्या कांहीं ऋचा म्हणून यजमान जी दक्षणा देत त्यावर ते आपला उदरनिर्वाह चालवीत ( अजूनही असे कांहीं ब्राम्हण दृष्टीस पडतात. ) त्यांना वाटलें कीं आपण बाबांसमोर वेदमंत्रांतील कांहीं ऋचा म्हटल्यास ते आपणांस भरपूर दक्षणा देतील. परंतु त्यांची समजूत अशी, कीं, बाबा एक मुसलमान अवलिया आहेत; तेव्हां त्यांच्यासमोर वेदमंत्र म्हणणें म्हणजे महाभयंकर पाप ! पण पैशाचा मोह माणसास काय करायला लावील आणि काय नाहीं तें कांहीं सांगतां येत नाहीं. या ब्राह्मणांनीं विचार केला कीं बाबा हिंदु किंवा मुसलमान या गोष्टीकडे आपण लक्षच देऊं नये; त्यांना पूर्णब्रह्म समजलें म्हणजे प्रश्नच मिटला. कारण पूर्णब्रह्माचें वास्तव्य कुठेंहि असूं शकतें —देवळांत, मशिदींत, चर्चमध्यें अथवा गटारांत किंवा स्मशानांतही. आणि ते पूर्णब्रह्मच असल्यामुळें जातपातीचा कांहींच प्रश्न नाहीं. पण पूर्णब्रह्म म्हटल्यावर त्यास नमस्कार करण्याचा प्रश्न साहजिकच येतो. एखाद्या यजमानासमोर ब्राह्मणानें कांहीं वेदमंत्र म्हटल्यास तो यजमानच उलट त्या ब्राह्मणांस नमस्कार करून आणखी वर दक्षणा देतो; पण पूर्णब्रह्म म्हणजे कांहीं सामान्य यजमान नव्हे. पूर्णब्रह्म म्हणजे प्रत्यक्ष परमात्मा; व त्यास अर्थातच पहिल्याप्रथम नमस्कार करणें ओघानेंच प्राप्त झालें. आणि येथेंच त्या ब्राह्मणांना गर्व झाला. कारण लोभापुरतें बाबांना पूर्णब्रह्म ठरविण्याची जरी त्यांच्या

मनानें तयारी केली तरी बाबांच्या पायावर मस्तक ठेवून नमस्कार करण्याची त्यांच्या मनाची तयारी होईना. पण नमस्कार केला नाहीं तर बाबा कदाचित् आपणांस दक्षणा देणार नाहींत अशी शंका या लोभिष्ट ब्राम्हणांस आली. व हा नमस्काराचा प्रसंग टळावा म्हणून खालील पद्धतीनें बाबांस बाबांस नमस्कार करण्याचें त्यांनीं ठरविलें.

पूर्णब्रह्मास ज्या वेळेस नमस्कार केला जातो त्या वेळेस दोन्ही हातांच्या मुठी वळवून फक्त आंगठे वर काढतात व त्या दोन्ही आंगठ्यांवर मस्तक ठेवलें म्हणजे तो नमस्कार पूर्णब्रह्मास होतो. अर्थात् ही नमस्काराची पद्धत श्रेष्ठ साधुसंत व ज्ञानी लोकांसच माहिती असते; इतरांस त्याची कल्पना नाहीं. तेव्हां या ब्राह्मणांनीं विचार केला कीं अशा तऱ्हेचा नमस्कार आपण बाबांसमोर करावा म्हणजे त्यांचे पायावर मस्तक ठेवण्याचे नको व बाबांनाहि वाटेल कीं हा नमस्कार आपणांसच केला आहे. त्यामुळें कांहींही अडथळा न येतां बाबांकडून सहजच आपणांस दक्षणा मिळेल.

अशी धूर्त योजना ठरवून हे ब्राह्मण—ते एकंदर चौघे होते—मुंबईहून निघाले व थेट शिर्डीस आले. बाबा नेहमींप्रमाणें मशिदींतच बसले होते. तेव्हां हे मशिदींत गेले आणि बाबांच्या समोर जरा नम्रतेचा आव आणून उभे राहिले. आव हा शब्द मुद्दामच वापरला आहे. कारण बाबांबद्दलची त्यांची भावना निराळी होती. त्यांचें सर्व लक्ष पैशावरच होतें. बाबांनीं त्यांना पाहतांच प्रश्न केला, 'काय पाहिजे?' त्यावर हे ब्राह्मण म्हणाले,

MATUNGA CLEANING WORKS.

ESTD. 1934

MODI NIWAS, BOMBAY 19

Washers Dyers and Dry Cleaners.

A Pleasure to you—a Satisfaction to us

**Chemical Cleaners, Super Fine Darners**

**Master Dyers**

*FOR*

**Cotton, Woollen. Silken & Jari Whole Cloths**

सर्व तऱ्हेच्या कपड्याची, धुलाई, रंग व रफू काम

व्यवस्थित करणार

**माटुंगा क्लीनिंग वर्क्स**

(स्थापना १९३४)

मोदी निवास, मुंबई १९

"आपणासमोर कांही वेद मंत्र म्हणावेत अशी इच्छा आहे; व त्यानंतर आपणांस जी योग्य वाटेल ती आमची संभावना करावी.' बाबांनीं होकार देताच त्या ब्राह्मणांनीं बैठक मारली व मंत्र म्हणण्यास आरंभ केला. त्यांना वाटलें कीं बाबांना यांतें काय समजतें ? फार तर २।४ मिनिटें ते आपली बडबड ऐकतील व मग कंटाळूनच ते आपणास दक्षिणा देऊन जा म्हणून म्हणतील. पण झालें उलटेंच !

त्या ब्राह्मणांनीं वेदमंत्रांतील २।४ ऋचा म्हटल्या मात्र, त्यांची स्मरणशक्तिच एकदम नाहींशी झाली ! त्यांना पुढें काय म्हणायचें तें आठवेना, अथवा आपण मागें काय म्हटलें तेंही स्मरेना. एखाद्या अजागळासारखे 'आ' वासून ते एकमेकांच्या तोंडाकडे पाहूं लागले. ही गंमत थोडा वेळ पाहिल्यावर बाबा त्या ब्राह्मणांस म्हणाले, 'असें एकमेकांकडे पहात स्वस्थ कां बसलांत ? म्हणा ना पुढें !' त्यावर ते ब्राह्मण लजील झाले व त्यांनीं म्हटलें, 'आम्हीं काय म्हटलें अथवा आम्हांस पुढें काय म्हणावयाचें आहे तें कांहींच आठवत नाही.' त्यावर श्रीबाबांनीं स्वतः पुढच्या २।४ ऋचा म्हटल्या. त्याबरोबर त्या ब्राह्मणांना ते सर्व मंत्र आठवले व त्यांनीं मग अस्खलित रीतीनें बरेच मंत्र म्हटले. थोड्या वेळानें श्रीबाबांनीं त्यांना थांबण्यास सांगितलें. तेव्हां आतां नमस्कार करण्याचा प्रसंग येऊन ठेपला. बाबांचें सामर्थ्य त्यांनीं आतां प्रत्यक्षच अनुभविलें होतें. तरी पण 'सुंभ जळाला तरी पीळ जात नाहीं.' या म्हणीप्रमाणें त्यांचा अजून पूर्ण गर्वपरिहार झाला नव्हता. अजून त्यांनीं बाबांना पूर्ण ओळखलें नव्हतें. म्हणून जेव्हां नमस्कार करण्याचा प्रसंग आला तेव्हां त्यांनीं पूर्वीच ठरल्याप्रमाणें दोन्ही हातांच्या मुठी वळवून व आंगठे वर काढून त्या दोन्ही आंगठ्यांवर मस्तक ठेवलें व अशा रीतीनें त्यांनीं श्रीबाबांस नमस्कार न करतां पूर्णब्रह्मास नमस्कार केला व दक्षणा मिळण्याचें आशेनें ते बाबांकडे पहात बसले. बाबा लगेच म्हणाले, 'कांहो ! तुम्ही पूर्णब्रह्मास नमस्कार केलांत ना ? मग पूर्णब्रह्माकडे दक्षणा मागा ! माझेकडे काय मागतां ? मी कांहीं पूर्णब्रह्म नव्हे !' त्यावर ते सर्व ब्राह्मण अत्यंत लजील झाले व बाबांना सर्व कांहीं कळतें, त्यांना सर्व माहिती आहे, ते खरोखरच पूर्णब्रह्म होत, याची त्यांना जाणीव होऊन त्यांचा पूर्ण गर्वपरिहार झाला व त्या त्यांनीं अत्यंत विनम्र भावानें बाबांचे पायांवर मस्तक ठेवलें.

नंतर श्रीबाबांनीं त्या ब्राह्मणांस यथायोग्य दक्षणा देऊन जाण्याची परवानगी दिली.

# ध्यानाचा अभ्यास कसा करावा ?

( लेखकः—पुरुषोत्तम मराठे )

आपल्या इष्टदेवतेचें ध्यान करण्याचा प्रयत्न कित्येक दिवसच, नव्हे कित्येक वर्षे करीत असलों तरीहि, ध्यानविषयावर आपलें मन एकाग्र होत नाहीं असा अनुभव आपल्याला येतो. श्रीसाईबाबांची प्रतिमा समोर ठेवून आपलें चित्त तदाकार करण्याचा प्रयत्न एका बाजूनें आपण चालविलेला असतांना, आपली दृष्टि शून्य होऊन आणि साईबाबांची समोरची प्रतिमा मनांतून पार जाऊन संसारांतलें एखादें दृश्य आपल्या मनश्चक्षूंसमोर केव्हां येऊन उभें राहिलें आहे हें आपल्याला कळतहि नाहीं एकाबाजूनें 'श्रीसाईसमर्थ' असा जप आपले ओंठ पुटपुटत असतात; पण त्या शब्दामागील कल्पनेचें विस्मरण होऊन आपलें मन इतस्ततः भ्रमण करूं लागलेलें असतें. हा अनुभव वारंवार येऊं लागला म्हणजे आपण आपल्यावरच कातावतों, कधीं-कधीं ध्यानावरची आपली श्रद्धाहि डळमळूं लागते. 'इतके दिवस ध्यानाचा अभ्यास करूनहि अध्यात्माच्या मार्गांत आपली प्रगति होत नाहीं. मग या मार्गाचा उपयोग तरी काय ?' असें आपण निराशेनें म्हणूं लागतों.

पण असें नाउमेद न होतां आपण नेमक्या चुका कोठें करीत असतों हें शोधून काढलें पाहिजे.

ध्यानाची पूर्वतयारी कशी करावी, ध्यानाचें स्थलकाल कसें असावें, प्रत्यक्ष ध्यान कसें करावें, ध्यानांत कोणते विक्षेप येतात व ते कसे घालवावे, ध्यानमार्गांत आपली प्रगति होत असल्याच्या खुणा कोणत्या, इत्यादि गोष्टींचें सविस्तर आणि सानुभव वर्णन अनेक ग्रंथांतून अनेक अधिकारी व्यक्तींनीं करून ठेवलेलें आहे. तें पाहून आपल्या अडचणींचा परिहार करण्याचा मार्ग त्यांत सांपडण्यासारखा आहे.

अलीकडेच पतञ्जलीच्या योगदर्शनावर मराठींत श्री. कोल्हटकर यांच्या उत्कृष्ट ग्रंथ प्रसिद्ध झाला आहे. पतञ्जलीच्या योगसूत्रांतील 'समाधिपाद' या प्रकरणाच्या सतराव्या सूत्राचें विवरण करतांना ग्रंथकार लिहितो :—

'साधकानें सवितर्क समाधीच्या अभ्यासाला लागावयाचें तेव्हां पुढीलप्रमाणें योजना करून लागावें. अभ्यासाला ज्या ठिकाणीं बसावयाचें तें स्थळ शांत, निर्भय आणि मनोनुकूल असावें. तेथें जवळच एखादी नदी किंवा जलाशय असेल आणि सभोंवतालच्या प्रदेशांतून प्रसन्न आणि लतादिकांच्या पुष्पांच्या सुगंधानें भरलेला वायु मंद लहरींनीं वाहात असेल तर तें ठिकाण ध्यानाभ्यासाला प्रथम प्रथम तरी फारच चांगलें, असें ठिकाण नच मिळालें तर आपल्या घरांतच देवघरासारखी एखादी अडी जागा

योजून ठेवावी कीं जेथें आपण अशुचि अवस्थेंत केव्हांहि प्रवेश करणार नाहीं. अशा पवित्र ठिकाणीं फार उंच नाहीं, फार सखल नाहीं, असें आसन बसण्यास घ्यावें. उंच आसनावर बसल्यास डळमळल्यासारखें होऊन चित्ताची एकाग्रता होण्यास अडचण पडते. अति सखल आसनानें भूमीवरील मुंग्या इत्यादि कृमिकीटकांचा उपद्रव होण्याचा संभव असतो. त्याचप्रमाणें खालची भूमि मांडीला रुतण्याचाहि संभव असतो. ह्या अडचणी टाळण्याच्या दृष्टीनें ' चैलाजिनकुशोत्तरम् ' असें आसन फार चांगलें. अगदीं खालीं दर्भासन घालावें, त्यावर मृगाजिन असावें आणि त्याच्यावर एखादी लोंकरीच्या वस्त्राची अथवा कापसाच्या धौत वस्त्राची घडी घालावी. अशा सुखासनावर ' समं कायशिरोग्रीवं ' म्हणजे शरीर, मस्तक आणि मान यांना अनैसर्गिक वांक इत्यादि येणार नाहीं असें बसावें; साधी मांडी घालावी किंवा पायास रग लागणार नाहीं अशा प्रकारचें पद्मासनासारखें एखादें साधें आसन करून बसावें. ....

आतां प्रत्यक्ष ध्यानाभ्यास कसा करावा ? पातञ्जल योगदर्शनकार लिहितातः—

" ध्यानाभ्यासास लागण्यापूर्वी उपास्यदेवतेची यथाशक्त्या मिळतील त्या उपचारांनीं अथवा मानसोपचारांनीं पूजा करावी; देवतेला सुकुमार, मनोहर आणि सुगंधी फुलांच्या माळा अर्पण कराव्या, आणि कस्तुरीसारख्या सुवासिक उदबत्त्या लावून अभ्यासस्थलांतील वातावरण सात्विक सुगंधानें भरून जाईल असें करावें. ह्यानंतर उपास्यदेवतेच्या मंत्राचा जप करीत ध्यानास प्रारंभ करावा. प्रथम प्रथम हा जप सावकाश, स्पष्ट वर्णोच्चार होऊन तो मंत्र आपल्या कानांत गुणगुणल्यासारखा ऐकूं येईल इतक्या मोठ्यानें करावा. अशा मंत्रजपाच्या वेळीं जमल्यास मधुर रव करणारी वीणा किंवा एकतारी, झणत्कारणारी झांज किंवा तालबद्धतेनें एकप्रकारची लय उत्पन्न करणाऱ्या चिपळ्या, इत्यादि उपकरणें सुद्धां वाटल्यास घ्यावीं. असा एकंदर थाट जमवून उपास्यदेवतेच्या ध्यानावर चित्तैकाग्र करण्याचा अभ्यास सुरू करावा. उपास्यदेवतेच्या नाममंत्राचा वीणादिकांच्या मधुर स्वनींत विलीन होणारा मधुर स्वर कानीं पडत आहे, वाणीनें मंत्राचा संथपणें आणि तालबद्ध उच्चार होत आहे, समोरची सुंदर ध्यानमूर्ति डोळे भरून पाहिली जात आहे, पुष्पादिकांचा सुगंध नासिकेच्या द्वारानें हृदयास आनंदित करीत आहे, आसपासचा मंद वायु आपल्या प्रशांत लहरींनीं स्पर्शेंद्रियाला सुखवीत आहे, आणि अशा सर्व प्रकारांनीं प्रहृष्ट झालेल्या मनाला मंत्रार्थानुसंधानपूर्वक ईशमूर्तीचें ध्यान घडत आहे, अशा स्थितींत साधकाची उपास्याच्या ध्यानांत जी तन्मयता होते, तीच स्थूल आभोगरूप ' सवितर्क समाधि ' म्हणून संबोधिला जातो... "

ध्यानाच्या वेळीं चित्तवृत्ति चिडचिडलेली, क्रोधाविष्ट अथवा दुःखानें भारावलेली अशी असतां कामा नये. मन प्रसन्न करण्यासाठीं बाह्य उपचारांची मदत प्रारंभीं तरी अत्यंत आवश्यक असते. ध्यानाचा अभ्यास कसा सुरू करावा याविषयीं राजयोगांत स्वामी विवेकानंदांनीं केलेलें विवेचनहि मनन करण्यासारखें आहे. स्वामीजी म्हणतात,

" शक्य असेल तोंपर्यंत त्या अभ्यासाकरतां अगदीं स्वतंत्र जागा असणें इष्ट आहे.

तीं खोली अगदीं पवित्र ठेवावी. त्या खोलींत कधींहि साप येऊं नये, अगर वेड्या-घोंकड्या चकाट्या पिटीत बसूं नये. स्नान करून शरीर शुद्ध झाल्यावर मन शांत करून मग त्या खोलींत प्रवेश करावा. त्या खोलींत रोज ताजीं व सुवासिक फुलें ठेवण्याची तजवीज बने तों करावी. सुवासिक फुलें हीं योग्यांचीं मित्र होत. तसेंच आपल्या आवडीच्या सत्पुरुषांचीं अगर देवांचीं चित्रेंहि त्या ठिकाणीं असलेलीं बरीं. सकाळ संध्याकाळ तेथें धूप जाळावा अगर उदबत्त्या लावाव्या. त्या खोलींत असतां कधीं भांडण करूं नये अगर एखादा अपवित्र विचारहि तेथें मनांत येऊं देऊं नये. आपल्या विचारांशीं ज्यांच्या विचारांचें अत्यंत साम्य आहे, अशाखेरीज दुसऱ्या कोणाहि मनुष्यास तेथें येऊं देऊं नये. विशेषतः ज्याचा आपण तिरस्कार करतों, अशा कोणासहि तेथें पाऊलहि घालूं देऊं नये. तुम्ही हे नियम अक्षरशः पाळले तर त्या खोलीची हवा पावित्र्यपणानें भरून गेली असल्याचा तुम्हांला खचित प्रत्यय येईल. क्वचित् प्रसंगीं तुम्हांला कांहीं दुःख प्राप्त झालें, मनाची चलबिचल झाली, मन कधीं संशयग्रस्त झालें अथवा कांहीं कारणानें तुमचें धैर्य खचलें, तर त्यावेळीं त्या खोलींत पाऊल टाकतांच तुम्हांस शांति प्राप्त होईल. देवळाची मूळ कल्पना हीच आहे. जीं मूळ परंपरेस धरून चालविलीं आहेत अशा देवळांत हा अनुभव तुम्हांस आजहि येईल; पण पुष्कळ देवळांतून आतां या कल्पनेचा लोप झाला असल्याचें आढळतें. पवित्र विचारतरंगांनीं एखादी जागा एक वेळ भरून गेली म्हणजे त्यांचा शांतिदायक संस्कार तेथें कायमचा राहतो. अशी खोली तयार करणें शक्य नसलें तर वाटेल तेथें अभ्यास करण्यासहि कांहीं हरकत नाहीं. प्रथम ताठ बसावें व मन शांत करून सर्व सृष्टि आनंदांत असावी असें चिंतन करावें. 'शांतिरस्तु। पुष्टिरस्तु। तुष्टिरस्तु।' या एकाग्र विचारानें मन भरून टाकावें. सर्व दिशांना अशी शांति सदैव नांदत असण्याबद्दल प्रार्थना करावी. तुमचें असें चिंतन खरोखर मनापासून होऊं लागलें म्हणजे प्रथम तुमचें स्वतःचें चित्त शांत होऊं लागेल. परार्थचिंतन स्वतःसच कल्याणकारक असतें असा आपणांस अनुभव येईल. सर्व जग सुदृढ असावें असें चिंतन करणारांची शरीरप्रकृति सुदृढ होते. सर्व जग सुखी असावें अशी इच्छा दृढ केल्यानें आपण स्वतः सुखी होतों...

"एवढें झाल्यावर स्वतःचें शरीर निरोगी राखण्याबद्दल ईश्वराची प्रार्थना करावी. संसारसागर ओलांडून आपणांस पैलतीराला सुरक्षितपणें पोहोंचविणारी तीच एक नौका आपणापाशीं आहे. आपलें शरीर वज्राचें बनविलें आहे असें चिंतन सदोदित करावें. आजारीपणांतहि त्या आजाराचा पगडा मनावर बसूं देऊं नये. मीं वज्रदेही आहें हेंच चिंतन सदोदित असावें. त्याचप्रमाणें मनोदौर्बल्यहि झुगारून द्यावें. दुबळ्या शरीराच्या आणि दुबळ्या मनाच्या लोकांना खरी ज्ञानप्राप्ति कधीं होतच नाहीं. हा कायदा नित्य ध्यानांत धरा..."

अधिकारी साधुसंतांनीं सांगितलेल्या या पद्धतीप्रमाणें ध्यानाच्या अभ्यासाला आपण प्रारंभ केला म्हणजे एक विचित्र गोष्ट आपल्या ध्यानीं येते. आपलें मन ध्येयमूर्तीवर

एकाग्र करायचें अशा निश्चयानें आपण बसलों म्हणजे, एरवीं सामान्यतः शांत असणारें आपलें मनहि जणूं कांहीं आपल्याला खिजविण्यासाठींच की काय, कमालीचें अस्थिर, चंचल आणि एकाग्रताशून्य बनतें। हृषीकेश येथील श्रीमत्स्वामी शिवानंदजी यांनीं आपल्या 'कन्सेंट्रेशन अँड मेडिटेशन' या ग्रंथांत साधकाच्या या अशा मनःस्थितीचें यथातथ्य वर्णन केलें आहे. ते लिहितात,

"जेव्हां तुम्ही ध्यानाला बसतां, आजूबाजूच्या सांसारिक वस्तूंचा विसर पडावा असा जेव्हां विचारपूर्वक प्रयत्न तुम्हीं करूं लागतां, तेव्हां विविध प्रकारचे संसाराचे विचार व अगदीं असंबद्ध आणि वेडगळपणाच्याहि कल्पना यांची तुमच्या मनांत एकच गर्दी उडते आणि त्यामुळें ध्यानांत व्यत्यय येतो. या प्रकाराचें तुम्हाला कमालीचें नवल वाटेल. जे विचार कित्येक वर्षांपूर्वी तुमच्या मनांत घोळत असत असे विचार एकाएकीं जागे होऊन तुमच्या मनाचा ताबा घेतात. पूर्वी केव्हांतरी भोगलेल्या सुखांचें स्मरण तुम्हाला एकदम होतें आणि त्या सुखस्मृतीचे बुडबुडे तुमच्या मनाच्या पृष्ठभागावर सारखे उमटत राहातात. त्या स्मृतीमागें तुमचें मन इतस्ततः भटकूं लागतें. तुमच्या संज्ञातीत मनाच्या बंद खोलीचें दार जणूं कांहीं एकदम उघडतें आणि त्यांत कोंडून राहिलेले विचार व स्मृति हीं भराभर बाहेर पडूं लागतात. या विचारांना दडपून टाकण्याचा तुमचा प्रयत्न जितका अधिक तितकी त्यांची उसळी मारण्याची शक्तीहि जास्त असा तुम्हांला अनुभव येतो...."

मन आपल्या इष्टदेवतेच्या ध्यानांत एकाग्र करण्याचा प्रयत्न करतांना जें असें एकदम सैरावैरा धांवूं लागतें त्याला आळा कसा घालायचा? त्याला दडपायचा प्रयत्न केला तर आपल्या काबूंत तें बिलकुल राहात नाहीं असें आढळतें. मग अशा सैराट मनाला ध्यानाच्या मार्गावर आरूढ कसें करायचें?

या प्रश्नाला स्वामी विवेकानंदांनीं एक अनुभवाचें उत्तर दिलें आहे. हा प्रश्न उपस्थित करून ते म्हणतात :—

"मनास इंद्रियांच्या ताब्यांतून सोडविणें शक्य आहे काय?

**'आधींच मर्कट तशांतहि मद्य प्याला। झाला तशांत मग वृश्चिकदंश त्याला।**
**झाली तयास तदनंतर भूतबाधा। चेष्टा वदूं मग किती कपिच्या अगाधा॥**

असा एक श्लोक आहे. त्यांत वर्णन केल्याप्रमाणें तंतोतंत आपल्या मनाची स्थिति आहे. तें स्वभावतःच चंचल वृत्तीचें; त्यांत मदिरारूप इंद्रियजन्यसुखाची इच्छा उद्भवते. या सुखेच्छातृप्तीच्या आड कांहीं आलें कीं क्रोधादि विंचू डसल्यासारखी स्थिति होते. यानंतर या सर्वांवर कडी करणाऱ्या समंधाचा म्हणजे अहंकाराचा प्रवेश होतो. हे मी एकवार तेथें आलें म्हणजे तें काय चेष्टा करील यांचें वर्णन करण्यास कोण समर्थ आहे? असल्या प्रकारचें मन आम्हांला कधीं तरी जिंकवेल काय? यास जिंकूं पहाणें म्हणजे वाऱ्याची मोट बांधूं पाहाणें अथवा मुंगीनें ब्रह्मांडगोल शिरावर घेण्याची तयारी करणें यासारखेंच आहे! पण असें असलें तरी भिऊन मागें सरण्याचें कारण नाहीं

"प्रथम आसन स्थिर करून स्वस्थ बसावें, आणि मनाच्या क्रियेस अडथळा करू नये: जिकडे तें भटकेल तिकडे त्यास भटकूं द्यावें. माकड झाडावर चढलें म्हणजे ज्या प्रमाणें तें या खांदीवरून त्या खांदीवर व तेथून तिसरीवर अशा उड्या मारतें, त्या प्रमाणेंच मन एकसारखें विषयांतर करीत असतें. पाणी तापलें म्हणजे जशा त्यावर एकसारख्या उकळ्या फुटत असतात, त्याचप्रमाणें मनावर एकसारख्या उकळ्या येत असतात. या उकळ्या थांबविण्याचा यत्न करून फायदा नाहीं. याकरितां त्या थांबविण्याचा उद्योग न करतां आपण कोणी त्रयस्थच आहों अशी भावना करून त्या उकळ्यांकडे पाहात बसावें. मनांत उद्भवलेली कोणतीहि कल्पना आपल्या अंतर्दृष्टींतून चुकूं देऊं नये. कल्पना कितीहि आणि कशाहि प्रकारच्या आल्या तरी त्यांस अडथळा करूं नये; पण आपल्या दृष्टीस पडल्यावांचून त्या जाणार नाहींत, व नव्या तेथें येणार नाहींत; अशी मात्र खबरदारी आपण अवश्य घेतली पाहिजे. या उकळ्यांपैकीं प्रत्येकीच्या अस्तित्वाचें ज्ञान आपणांस झालेंच पाहिजे, अशी भावना दृढ करावी. अर्धा तास आपण मनाचा अभ्यास केला तर तेवढ्या वेळांत आलेल्या सर्व कल्पनांची क्रमशः नोंद करण्याची आपली तयारी असली पाहिजे. ज्ञान हें सर्व शक्तीचें मूळ आहे हें आपणांस अवगत आहेच, आपलें मन कसल्या प्रकारच्या कल्पना करतें, याचें ज्ञान आपणांस झाल्याखेरीज त्याचें नियमन करण्याचें सामर्थ्य आपणांस प्राप्त होणार नाहीं. कल्पनातरंग मनावर उद्भवतो कसा आणि नंतर नष्ट होतो कसा, याचें ज्ञान झालें म्हणजे मनाच्या कर्तृत्वशक्तीचें ज्ञान आपणांस होईल. यासाठीं मन आवरण्याची खटपट न करतां त्याला अगदीं मोकळें सोडून द्या. तें भटकेल तिकडे भटकूं द्या; पण त्यावर उठणारे तरंग आपल्या दृष्टिपथाबाहेर जाणार नाहींत अशी खबरदारी मात्र घ्या. तुम्हीं आपलें मन अगदीं मोकळें सोडून त्याकडे पाहात बसलां, म्हणजे कित्येक वेळां अगदीं घाणेरडे विचारतरंग तेथें उत्पन्न होत असतात असें तुमच्या लक्षांत येईल. इतके घाणेरडे विचार आपल्या मनांत येतात हें पाहून तुमचें तुम्हांसच नवल वाटेल! पूर्वीं ही गोष्ट तुमच्या लक्षांत आली नसल्यामुळें आपलें मन इतकें गलिच्छ असेल अशी तुमची कल्पनाहि नव्हती. पण मनावरील तरंगांकडे पाहात बसण्याचा अभ्यास तुम्ही करूं लागलां म्हणजे त्यावरील कोणताहि तरंग तुम्हांस अज्ञात राहूं शकत नाहीं. अमुक एक प्रकारचे विचार आपल्या मनावर उद्भवतात व ते अहितकारक आहेत याचें ज्ञान तुम्हांस झालें म्हणजे तुमचें मन अशा कल्पना आपोआप सोडूं लागतें. अशा रीतीनें तुमच्या कल्पनासमूह हळूहळू कमी होऊं लागतो. कल्पनासमूह कमी होऊं लागला म्हणजे मनाच्या वेगास आळा बसून तें शांत होऊं लागतें. आरंभीं कांहीं महिने अनेक प्रकारच्या कल्पना तुमच्या मनावर उत्पन्न होत असतात असा अनुभव तुम्हांस येईल; पण पुढें हा कल्पनासमूह लहान होत आहे असेंहि तुम्हांस दिसेल. अशा रीतीनें तुमच्या कल्पनासमूहाचा परिघ लहान होत होत मन अगदीं शांत होईल, आणि अशा स्थितींत तें ताब्यांत आणण्यास फारसें जड जाणार नाहीं..."

मन सैरावरा धांवत सुटल्यामुळें ध्यानाभ्यासांत जसा विक्षेप येतो, तसाच पण उलट रीतीनें ध्यान यशस्वी होत असल्याचा आभास हाहि एक विक्षेप असतो. तोहि साधकानें ओळखला पाहिजे. या प्रमादाचें वर्णन करतांना शिवानंदजी म्हणतात,

" केव्हां केव्हां तंद्रा आणि मनोराज्य यांचें मिश्रण साधकाच्या मनांत निर्माण होतें आणि या स्थितीला तो ध्यान व समाधि समजूं लागतो. मन अगदीं एकाग्र झालें आहे, विक्षेपरहित बनलें आहे असें साधकाला वाटतें. ही मोठी चूक आहे. आपल्या मनाचें सूक्ष्म निरीक्षण करण्यांत खंड पडूं देऊं नका. विचार, प्राणायाम, सात्विक आहार यांचा अवलंब करून तंद्रा आणि मनोराज्य यांना हुसकावून लावा. आपल्यावर यांचा पगडा बसतो आहे असें आढळल्यास उठून दहा मिनिटें उभे राहा, तोंडावर, कपाळावर मानेवर गार पाण्याचा शिडकाव करा.

" कधीं कधीं असें होतें कीं ध्येयविषय सोडून मन भलतीकडेच गुंग होऊन राहिलेलें असतें. यासाठीं असें होणार नाहीं याकडे बारीक लक्ष ठेवलें पाहिजे. अशावेळीं केव्हां केव्हां साधक गुंगींत जातो आणि त्याला खरोखरी झोंप लागते. या झोपेलाच तो समाधि समजतो.... "

वर तंद्रा आणि मनोराज्य यांचा निरास करण्यासाठीं प्राणायाम हा एक उपाय सांगितलेला आहे. सामान्यतः प्राणायाम कसा करावा हें अनुभवी गुरूकडून प्रत्यक्ष समजून घेतलें पाहिजे. हें असलें तरी असा गुरु भेटलेला नसतां स्वतःच्या बळावर करतां येण्याजोगा, व कांहींहि धोका नसलेला एक प्राणायामाचा प्रकार स्वामी विवेकानंदांनीं सांगितलेला आहे. तो त्यांच्याच शब्दांत सांगणें चांगलें. स्वामीजी लिहितात:—

" श्वास आणि उच्छ्वास हे नियमित वेळांत येतील व जातील असा अभ्यास प्रथम करावा. अशा प्रकारच्या अभ्यासानें सर्व शरीरांत एकतानता उत्पन्न होऊं लागेल. अशा रीतीचा अभ्यास थोडा वेळ केल्यानंतर, श्वासोच्छ्वासाबरोबर प्रणवोच्चार करावा. हा उच्चार तोंडांतून स्पष्ट करावयाचा नाहीं तर श्वास जातेवेळीं आणि येतेवेळीं प्रत्येकाबरोबर मनांत ॐ हा उच्चार करावा. श्वास आंत घेतांना आरंभापासून श्वास आंत घेण्याची क्रिया समाप्त होईपर्यंत, मनानें ॐ या अक्षराचा ध्वनि श्वासाबरोबर एकसारखा चालू राहिला पाहिजे. त्याचप्रमाणें उच्छ्वास बाहेर जातांना ती क्रिया अगदीं समाप्त होईपर्यंत असाच ध्वनि चालू ठेवला पाहिजे. अशा रीतीनें श्वासोच्छ्वास व प्रणवजप हीं समांतर सुरू झालीं. म्हणजे सर्व शरीरभर एकतानता उत्पन्न होऊं लागल्याचा तुम्हांला प्रत्यक्ष येईल. या योगें शरीर आणि मन यांस खरी विश्रांति मिळूं लागते. खरी विश्रांती म्हणजे काय आहे, याचा वास्तविक अर्थ तुम्हांस अशाच स्थितींत बरोबर कळेल. गाढ झोंपेची विश्रांति म्हणजे या विश्रांतीपुढें कःपदार्थ आहे असा तुम्हांस अनुभव येईल. तुमच्या ज्ञानतंतूंना कितीहि थकवा आला असला तरी या अभ्यासास सुरुवात केल्याबरोबर त्यांस शांति प्राप्त होऊं लागेल. खरी विश्रांति आपणांस यापूर्वी कधींच प्राप्त झाली नव्हती, असें तुम्ही म्हणूं लागाल ....

ध्यानाची पूर्वतयारी, ध्यानाचें स्थलकाल, ध्यानाची पद्धति, ध्यानांतील कांहीं विक्षेप व त्यांचें निराकरण करण्याचा मार्ग याबद्दल आपण आतापर्यंत थोडक्यांत माहिती मिळविली. आपल्या ध्यानाभ्यासानें आपली आपल्या इष्ट मार्गांत प्रगति होत आहे कीं नाहीं हें कसें ओळखायचें? यासंबंधीं, कांहीं खुणा स्वामी विवेकानंदांनीं सांगितल्या आहेत. ते म्हणतात—

"या अभ्यासाला प्रारंभ केल्यानंतर त्याचा परिणाम प्रथम चेहऱ्यावर दिसं लागतो. चेहऱ्यावरचा नूर एकदम बदलूं लागतो. चेहऱ्यावरील खरबरीतपणा नाहींसा होऊन त्यावर तुळतुळीतपणा व तजेला येऊं लागतो. हृदयांत उत्पन्न होणाऱ्या शांतीची प्रतिभा चेहऱ्यावर स्पष्ट दिसूं लागते. आवाजांतहि अंशाच बदल होतो. आवाजांतील कर्कशपणा नाहींसा होऊन त्यांत मधुरता उत्पन्न होऊं लागते. 'काकवत् कर्करायते' असा एकहि योगी माझ्या अवलोकनांत आलेला नाहीं......"

आणखी एका ठिकाणीं स्वामीजी सांगतात—

"योगाचा प्रभाव असा प्रचंड आहे कीं त्यापैकीं एखादा अंश जरी तुम्हांस साध्य झाला तरी तो तुमचें मोठें कार्य करील. त्यामुळें तुम्हांस अथवा इतरांस अपाय तर होणार नाहींच पण तुमचा फायदा होऊन इतरांसहि त्याचा लाभ मिळण्याचा संभव आहे. ज्ञानतंतूंचा क्षोभ कमी होणें हा या अभ्यासाचा पहिला लाभ आहे. त्यामुळें आपलें मन सदोदित शांत राहून कोणत्याहि कारणकार्यांचा औचित्यानें विचार करण्याजोगी स्थिति त्याला प्राप्त होते. आपल्या स्वभावांतहि अधिक मार्दव आणि शांति येऊं लागते. या मानसिक स्थितीचा परिणाम शरीरावर घडून त्यामुळें प्रकृतिहि चांगली राहते. आवाज सुधारून तो अधिक गोड होऊं लागतो. आवाजांतील कोणतेहि दोष सुधारूं लागतात. अभ्यासास आरंभ केल्यानंतर थोड्याच काळांत या चिन्हांचा उगम होऊं लागतो. अभ्यास नियमानें आणि निश्चयानें चालविला म्हणजे हीं चिन्हें अधिक उघड होऊन दुसरीं नवीं चिन्हेंहि दिसं लागतात. आपणापासून बऱ्याच अंतरावर घंटा एकसारखी वाजत असतां जसा नाद आपणांस ऐकूं येईल, त्यासारखा नाद आपल्या कानांत होऊं लागतो. तसेंच कित्येक वेळां दृष्टीपुढें तेजाचे बारीक गोळे दिसतात आणि तेच वाढत जाऊन मोठे तेजोगोल दृष्टीसमोर दिसूं लागतात. अशीं चिन्हें प्रत्ययास येऊं लागलीं म्हणजे आपला मार्ग झपाट्यानें आक्रमण होत आहे अशी खूणगांठ तुम्ही बांधून ठेवा...."

---

# कृतज्ञता नंदोद्गार...

लेखकः—श्री. विष्णुदत्त महाराज
( संस्थान—कोपरली, प. खा. )

योगचैतन्य श्रीसाईनाथचरणीं असून तें शिरडीच्या चैतन्यमय वातावरणांत चिद्रूपानें अखंड स्फुरत आहे!

कोपरगांव मुक्कामीं ज्ञानेश्वरीप्रवचनार्थ मुरलीधराचें देवालयांत येणें झालें. नवमीच्या दिवशीं प्रवचन संपल्यानंतर रात्रीं कुणीसें सुचविलें—'उद्यांक साईनाथ उत्सव असून आपण येण्याचें करावें!' प्रथमतः दुसरे कार्यक्रम असल्यामुळें त्याकडे तितकेंसें लक्ष घातलें नाहीं. परंतु...!

देवालयांत सर्वत्र आवराआवर होऊन झोंपण्यासाठीं बिछान्यांवर पडल्यानंतर झोंप येईना. कोठून तरी जाईच्या फुलांचा सुगंध येत आहेसें वाटलें. परंतु पुन्हां तो जास्त स्पष्ट रीतीनें येऊं लागला. सर्वत्र शोधलें परंतु कोठेंही फुलें सांपडलीं नाहींत. पुन्हां कंटाळून बिछान्यावर पडतांच धूपाचा सुगंध इतक्या तीव्रतेनें जाणवला कीं उठून शोधल्याशिवाय राहवलेंच नाहीं. कोठेंच धूपाचा किंवा फुलांचा मागमूसहि सांपडला नाहीं. शेवटीं हा सुगंध इतका उत्कट—तीव्र होऊं लागला कीं तो देवालय व्यापून भरला—सर्व शरीरभर कोंदाटला—मनांत—प्राणांत श्वासांत तोच भरला. नेत्रांतून अश्रू येऊं लागले; देह रोमांचित होऊन काय आहे तें कळेनासें झालें. पुनः पुन्हां स्वानंदचैतन्यप्रेममूर्ति सद्गुरु केशवदत्तमहाराजांची मूर्ति डोळ्यांसमोर येई. जवळ जवळ दोन वाजेपर्यंत हा प्रकार सतत तीन वेळां झाल्यानंतर झोंप कशी येणार? ती अखंड जागृत, केवळ आनंदमय अवस्था शब्दातीत आहे.

प्रातःकाळीं जरा उशिरांच जागृत होऊन नित्यनियमास लागणार तोंच श्री. लक्ष्मणराव पाटील यांनीं येऊन शिर्डीस जाणारी मोटार आतां ५ मिनिटांतच सुटेल, आपण अवश्य यावयास हवेंच असा प्रेमाग्रह चालविल्यानंतर तो मान्य करून उठावें लागलें.

आनंदमाहेर शिरडीच्या अखंड विद्युन्मय वातावरणांत वावरणाऱ्या श्रीसाईचैतन्य विद्युल्लहरींचा आनंदमय चित्स्पर्श अनुभवला!

रात्रींच्या सर्व प्रकारांचें स्मरण होतांच मुंबईचे श्री. वाघ उद्गारले—

'आम्हीं सांगितल्यानंतरहि आपण दुर्लक्ष केल्यामुळेंच आपणांस श्री केशवदत्तांनीं ही सूचना दिली असावी असें आम्हांस वाटतें!'

एखादें कोडें उलगडावें त्याप्रमाणें रात्रीच्या सर्व प्रकाराचा अर्थ कळल्यामुळें हृदयसागर उचंबळून आला!

चैतन्यप्रेमानंद श्रीसद्गुरुमूर्ति केशवदत्तमहाराज आणि योगानंद योगेश्वर श्रीसाईनाथ यांचे चरणीं नेत्रांतून वाहाणाऱ्या या अश्रुमाला कृतज्ञतेनें समर्पण.

---

# SHRI SAI AND BHAKTI

by :– Dr. V. V. Rao PH. D., Madras

The chief concern of human life is how to acquire and preserve happiness, This is sought for, with persistent endeavour, from various departments of human activity. But the wonderful inner path to a supernatural kind of happiness is Bhakti. The various religious beliefs that men cling to, afford ample evidence, regarding the truth lying behind this Bhakti. Such beliefs ought to be true, ethical and empirical too. This, say the elders, makes one realise the near presence of God's spirit which can be experienced in reality and happiness, is the point from which every efficacious Bhakti starts. The simplest kind of religious happiness having the more complex sorts, to veterans in the line, can be derived by safely banking upon the religious impulses, which have come down to us traditionally. These in turn make us realise, that God is not merely, a strict judge, a glorious potentate, but the animating spirit of this cosmic, beautiful universe; kind and merciful. This strengthens one's Bhakti and thus nature that surrounds us, makes the opening of religion, very happy and acceptable. But we see all around us, with profound regret, the religious struggles of people, as if essential for the formation of our spiritual life.

What then is the mysterious factor, that can take away the sting from these struggles and make our Bhakti, simpler and easier, for simple folk to follow and practise ? The answer is Baba – Sri Sai of Shirdi, who in His Divine manifestation, has taken upon Himself, the task of harmonising our material existence, with the spiritual development, that we long for, through the medium of Bhakti. He knows the lamentable and miserable, lost and undone condition of men, in this mundane world, He draws us to Him in a mysterious way, awarding us some strange experience, healing the sick and affording solace to the heavy hearted in a variety of ways, This further strengthens Bhakti and creates tremendous emotional religious excitement, in the twinkling of the eye, making us realise, the complete division between, the old life and the new.

Strange are the experiences of His devotees and it behoves us to hear and study them, conscientiously, for they are not mere generalised accounts but concrete instances, Thus we become converted to a spiritual state. Such cases of strange conversion can be narrated indefinitely, but one or two instances mentioned here, are enough to show how real, definite and memorable, our conversion, can become. With these new converts, Sai Bhakti is not putting on a new patch of holiness, but holiness is woven into our state, principles and practices. Thus we become a new fabric, new men and new creatures. Thus Bhakti inculcated in us by Sai, give us an appearance of newness beautifying our lives. The dreadful unreality and strangeness, in the appearance of the World, which almost every day baffle us, this flesh being heir to a million ills, troubles, trials, tribulations and temptations, gradually disappear, The sense of divine values then gradually increases and becomes more and more lively and presents more of inward sureness, which we have ever missed. Life thus gets altered effectively through Bhakti. Nature itself is seen altered. There seems to be as it were a calm sweet cast or appearance or divine glory, in the environment, in which we are thrust. Thunder and lightning, all the physical phenomena, the cares and worries of material existence, all become acceptable, for we are drawn to the golden feet of Sai, through the Bhakti, He creates in us.

These experiences that come to us, through Bakti, make us certainly realise that life is not transcient but permanent. If further backsliding and relapses occur, as they are bound to since the flesh, we are encased in, is weak, let us further and faster cling to His feet and He surely creates again, stronger links to bind us firmly to His feet, surrendering our individuality, to be guided and transformed by Him – our Saviour.

Here is something that must further caution us, preventing us from falling into the snares of pseudo-saints, who do come across us, pretending to be Baba's direct or ordained disciples, contributing thus effectively to our fall. Sai Bhakti is an armour that can make us withstand these pitfalls, for He has stated in unambiguous terms, that wherever, we may be, "Even seven seas away" He draws us to Him and makes us reach the fruits of the religious state, that we have a constant yearning for. There is plenty of creative religious force in man, tending to generate in us a great degree

of virtue. Though we are steeped in materialism, we realise, we have potentialities of development, for the realiastion of unfathomable bliss. Baba through Bhakti makes us do this, while through Bhakti He softens, converts and regenarates our irretrievably hardened lives, thus granting us the solace, that we need in abundance.

Mrs. S's son has a temparament full of fire and life. But perversion set in and he was induced by some unwanted individuals to marry a girl, not acceptable to the environment in which the family is placed. Mrs. S, a good child of Baba tried all means of persuasion, to prevent the son from contracting this alliance. But the boy was adamant. She prayed to Baba, day and night ceaselessly, oft repeating "Baba will you kindly stop this?." The day fixed for the marriage, was Sunday in that week of prayers. On Saturday, the boy had to go–a shopping and the party was in readiness to take him. Still Mrs. S. continued the prayers. Lo ! she found her son prostrate at her feet, asking for forgiveness, promising absolute surrender to the will of the parent, all within a few hours of lighting the marriage fire. Is this not Grace ! Is not Baba our real, friend and guide ! Since then the boy has been converted and has been clinging on to Baba's divine feet.

Mr. N is a great devotee of Baba. His only son, his one and only interest in this material existence of his, was decently employed a thousand miles away from him. But on medical grounds he was dislodged. He prayerfully appealed to Baba to get his boy re-employed. This so greatly occupied his mind that he could not but persist in this demand. One day, look at the kindness of Baba, and His Divine intercession, in our affairs, he saw a number '76' appearing to him as if in a vision. He noted it in his diary not being able to know, what that meant for him. On the 76th day, his son was employed on the same scale and the status quo was restored. Later he was also transferred to his father's place.

There is something profound in all this, which creates a secular safeguard for us and gives us a prudential guarantee, that if our surrender is complete to Sri Sai, by our Bhakti, which He always characteristically calls 'love', we can safely pass the crises of life and attain spiritual bliss too !

OM SRI SAI.

# साईबाबा खरोखर कोण होते?

श्री साईबाबांची सुंता झालेली होती व ते मुसलमान होते असें दर्शविणारा एक लेख मद्रासमधील ' साई-सुधा ' नियतकालिकांत प्रसिद्ध झाला होता. यांच नियतकालिकांत साईबाबा हे गुजराती ब्राह्मण कुटुंबांत जन्माला आलेले होते अशा आशयाचा मजकूरहि एका अंकामध्यें आला होता. त्यासंबंधीं विचारणा करणारीं दोन पत्रें—एक ऑल इंडिया साई समाजाचे अध्यक्ष श्री. बी. व्ही. नरसिंह स्वामी यांना व दुसरें साईसुधाचे संपादक यांना—उद्देशून शिरडी संस्थानच्या वतीनें चिटणीस श्री. डी. वी राणे यांनीं पाठविलीं होतीं. तीं पत्रें येथें देत आहेंत. या पत्रांना साईसुधाच्या संपादकांकडून आलेलें उत्तरहि पुढें दिलें आहे. साईसुधामध्यें जीं विधानें साईबाबांच्या पूर्वायुष्याविषयीं केलेलीं होतीं व जी माहिती दिलेली होती ती ' संपूर्णतः फवडीमोल आणि अविश्वसनीय ' असल्याचें साईसुधाकारांनीं आपल्या पत्रांत प्रांजळपणें मान्य केलें आहे.

## शिरडी संस्थानकडून गेलेलीं पत्रें

*To*

Shri, B. V. Narasimha Swami
President All India Sai Samaj
C/o Sai Sudha, Mylapore, Madras.

Dear Sir,

In your article on Sai Baba's History, Ch, II, Birth, parentage (contd.) published on P. 16–17 in Sai Sudha of November 1950 (Vol, II, part 6) you have stated as under;–

"In the case of Baba, as in the case of Kabir, there seems to have been circumcision. But this is naturally to be accounted for by Baba's being brought up in his very early years by a Fakir–a fact admitted by all writers on Baba. As for the fact itself of circumci-

sion, there however seems good reason to consider the evidence as weak. In the first place, circumcision relates to private organs, unlike the boring of ears, and people especially like Baba, do not expose themselves for examination. When Baba was observed by a large No: of persons flocking to him, it was long after his 50th 60th year had apparently passed, i. e, when his hair had grown thoroughly grey and his skin had thoroughly shrunk. With a shrunken skin all over the body, circumcision or no circumcision cannot be easily determined, Yet people like Mr. R. B. Purandare, have positively stated that they noted the presence of circumcision."

In this quotation you say in the beginning that the evidence of circumcision in Baba's case was weak, but as you go on, you make the evidence strong by stating that people like Mr. R. B. Purandare noted the presence of circumcision.

As it is quite important and necessary to determine for the sake of future Sai-Bhaktas whether Sai Baba was a Hindu or Mohomeddan the evidence of circumcision or otherwise becomes very relevant for deciding this question finally authoritatively. So you are requested to state or adduce any evidence to support your above statement that people like Mr, R. B. Purandare have positively stated that they noted the presence of circumcision.

The question of birth, parentage &c in the case of sages and saints is not of much importance, but as Sai Sudha raised this question in the case of Sai Baba, now and then, it seems desirable that this question should be finally considered and settled once for all.

An early reply will certainly oblige etc.

---

To

The Editor Sai Sudha, Mylapore, Madras

Dear Sir,

It is. well-known that Sai-Bhakti is proceeding apace in the Madras Presidency. Lectures, articles Kirtans, dramas & cinemas &c are all being used to propogate Sai-Bhakti.

We give two instances from Sai Sudha,

(I) The A. I. S. S. President was shown a very long message of II pages in manuscript in Tamil, purporting to come from Baba where in Baba is narrating that he was born at Srivaikuntam the Southern end of India, of a Tamil speaking Vaishnavite lady; --- that his father who was living with that lady as man & wife was an Abdul Sathar Saheb, that in his very yearly years his parents moved to Shirdi and he was continuing his Tamil study, that his father -- died in his early infancy, that he got Vairagya and initiation from some guru, that his mother died -- some years later & then he suddenly returned from his wandering tour just to be present at her death & that thereafter he began his roaming fakir life &c. Though you have stated on P. 12-13 of October 1950 No, that this story is wholly uncorroborated and therefore must be unhesitatingly rejected, Still as you have given publicity to it in your esteemed journal, it assumes an undesirable importance.

(II) On P. 13 of the same No. you have given another of Baba's life which is also wonderful, It is from a booklet in English by Rajarshi Bala Sanyasi Himalayas, published by Parashakti Publishing House Bangalore (I). according to this version Baba was born at 9 P. M. on 11-8-1858 of a Gujerati Brahmin Nandlal and Jumnabai. The parents met a fakir before Baba's birth, that he took them on a Haj and other pilgrimages and during the course of these pilgrimages Baba's mother gave birth to him at the Jaffa gate at Jerusalem (Mid-Asia). There they stayed for some days and returned to India, and stayed at Pathri in 1862. His parents died in 1863 and then Baba himself trudged on the road to Brindavan in 1868. There he was deserted by his companions and was almost famishing with hunger, when his holy Guru Ramchandra Babaji appeared before him, took him from place to place up to the Himalayas and gave him initiation into Para Sakti Puja and some mantra. The author Bala Sanyasi was then a co-disciple of Baba under the same Guru.

This is also pseudo-biography according to you, but as publication to this is given in your important journal, it may assume an undesirable importance.

It is true that we should not attach mnch importance to the question of birth, parentage of great sages & saints, but as you have raised the question of Sai Baba's birth &c by publishing pseudo, Biographies' as detailed above, it has assumed unnecessary importance and we think that in the interests of all Sai-Bhaktas present & future this question should be considered & determined once for all finally and authoritatively.

Waiting for an early reply etc.

From the Editor of Sai Sudha,

---

## साई सुधाच्या संपादकाचें उत्तर

To

Shri. D. B. Rane,
105-J, Tara Baug.
Love Lane, Mazagaon,
Bombay—10

Dear Sir,

In reply to yours af 16-1-'53, I beg to state as follows:-

An authoritative and final statement of the truthfulness or untruth of the following two statements is wanted. I give a final and unhesitating affirmation that both the statements referred to in your letter are perfectly worthless and unreliable.

Firstly, the long Tamil manuscript given to the A, I. S, S President by the late V. Ganapathy Shastri purports to be a sort of planchette writing by the ladies of that gentleman's (V, G.'s) hous

There is not an iota of corroborating evidence for that lo message and the A, I. S, S. President therefore consigned it to t Dust Bin, If Baba was Tamil-born and read up and spoke Tan

in his early years, he would have uttered at least one Tamil word or referred to South India as once his home. He never did this even though Madrasi groups like Adilakshmiammal's group ("Ramdasis") who are referred to in Sai Satchanddra, as having had the vision of Rama in the body of Sai at Dwarka Mayee visited him. Dr. Pillai and his brother and friends also were Madrassis hailing from Nagpur. The President met Adilakshmi's group and Dr. Pillai's brother. Neither these nor any other devotees have hinted that Baba belonged to the extreme South of Madras Presidency or knew Tamil. Baba has referred to his having visited the Coromandal Coast (see Baba's Charters and sayings).

Secondly, the Rajarishi Balasanyasi "of Hardwar" is another utterly unreliable person. He looks about 60 or 65 and he admits his age is about that. If Baba lived now, he would be well over 100 years of age. This Balasanyasi could never have been a fellow disciple of Sri Sai Baba. Sri Sai was known to fame in 1880 and 1882. The Sub-Judge Garde's guru visited him at Shirdi then and thought highly of him and asked Shri Garde to visit him (see Devotees' Experiences). This Balasanyasi was either unborn or was a tiny infant then, Balasanyasi professes to have visited Baba during his life time, at Shirdi. No one speaks of this Balasanyasi among the devotees who gave out their experiences. This Balasanyasi is an agent for the sale of Bangalore cinema shares; and persons who met him and dealt with him report that his words are not reliable,

In spite of all this, this Balasanyasi is spreading faith in Sai Baba in his own peculiar way. So no further attack is made on him in the Sudha, than the statement that his book is a bold concoction and utterly lacks confirmation. In fact, the statement of Baba to Mahlsapathy that he was born at Patri is a direct contradiction of this Balasanyasi.

Yours sincerely
K. Radhakrishna




## डिसेंबर १९५२:—

**या** महिन्यांत भक्त लोकांची रीघ नेहमीपेक्षां जरा कमीच होती. भक्तांकडून श्रीं[illegible] देणग्या व वस्तू अर्पण करण्यांत आल्या. नेहमीप्रमाणें एकादशीस संस्थान–गव[illegible] यांचीं कीर्तनें झालीं. श्रीमती मेनका शिरोडकर, श्रीमती विनोदिनी दिक्षित व इत[illegible] बऱ्याच कलाकार भक्तांनीं आपल्या कलेची बाबांसमोर हजेरी दिली.

या महिन्यांत नवल विशेष असें फारसें नाहीं. ता १ रोजीं संस्थानतर्फे श्रीदत्तजं[illegible] तीचा उत्सव साजरा करण्यांत आला. त्यानिमित्त संस्थान–गवई श्री. विठ्ठलराव मरा[illegible] यांचें दत्तजन्मावर कीर्तन झालें.

श्रींचें दर्शन घेण्यास ता. २५–१२–५२ रोजीं कमालीची गर्दी लोटली होत[illegible] तो दिवस गुरुवारचा होता व त्या दिवशीं नाताळनिमित्त सरकारी कचेऱ्या, बँका, शाळा इत्यादिकांना सुट्टी असल्यामुळें ही संधी साधून अत्यंत लांबलांबचे भक्त श्रींचें दर्श[illegible] घेण्यास शिर्डीस आले होते. कमींत कमी १०।१५ हजार तरी भक्तगण आले असावे[illegible] असें बोललें जातें. संस्थानांत असलेली जागा अपुरी पडल्यामुळें अनेक भक्तलोकांची सोय गांवकऱ्यांनीं आपल्या घरांतून केली. तसेंच कांहींची सोय शाळेंत व गांवांती[illegible] मारुती, शनि, महादेव, इत्यादि देवाल्यांतूनही करण्यांत आली. या बाबतींत ज्यांनी ज्यांनीं प्रेमळपणें व्यवस्थापक समितीशीं सहकार्य केलें त्या सर्वांची व्यवस्थापक समिति आभारी आहे.

ता. २५–१२–५२ रोजीं व्यवस्थापक समितीची बैठक (Meeting) शि[illegible] र्डी येथें घेण्यांत आली. व्यवस्थापक समितीचे बहुतेक सर्व सभासद बैठकीस उपस्थित [illegible] होते. शिर्डी येथील संस्थानतर्फे चालविण्यांत येत असलेल्या धर्मार्थ होमिओ द[illegible] वाखान्याचा या महिन्यांत सुमारें १६०० रोग्यांनीं फायदा घेतला. बऱ्याच भक्तांनी दवाखान्यासाठीं देणग्या दिल्या.

शिर्डीचें हवापाणी या महिन्यांत उत्तम होतें.

## जानेवारी १९५३:—

**याही** महिन्यांत शिर्डीस श्रींचे दर्शनास येणाऱ्या भक्तांची रीघ सारखी चालूच हो[illegible] होती बऱ्याच भक्तांकडून श्रींस देणग्या (रोख व वस्तुरूपानें) अर्पण करण्यांत आल्या. नेहमींप्रमाणें एकादशीस संस्थान–गवई यांचीं कीर्तनें झालीं. अभिषेक, अर्चन लघुरु[illegible] पूजा नैवेद्य, अन्नदान, वगैरे धार्मिक विधी संस्थानतर्फे यथासांग पार पाडले गेले.

भक्तलोकांच्या सोईसाठीं या महिन्यांत संस्थानतर्फे दोन विशेष गोष्टी केल्या
ल्या : (१) 'श्रीसाईबाबा संस्थान वाचनालय' १ तारखेपासून सुरू करण्यांत
ालें, व (२) गुरुवारीं श्रींस ११ चे सुमारास मंगलस्नान घालण्यांत येत असे तें
ांतां रोजच्याप्रमाणेंच ७॥ चे सुमारास घालण्यांत येतें.

गुरुवार ता. २९-१-५३ रोजीं खग्रास चंद्रग्रहणानिमित्त समाधिमंदिरांत संस्थान-
र्फे नित्यकार्यक्रमाव्यतिरिक्त कांहीं विशेष कार्यक्रम ठेवण्यांत आले होते. त्या दिवशीं
ालखीचा कार्यक्रम झाल्यावर शेजारती न होतां समाधिमंदिरांत कीर्तनाचा कार्यक्रम
ााला. नंतर गायनवादनादि कार्यक्रम होऊन ऐन ग्रहणाच्या कालांत श्रींस अभिषेक
रण्यांत आला. नंतर श्रींस मंगलस्नान घालण्यांत येऊन पुढचे कार्यक्रम नंतर रोजच्या-
प्रमाणें पार पाडण्यांत आले. शुक्रवारची कांकड आरती अर्थातच झाली नाहीं. अशा
ीतीनें श्रींचे मंदिरांत जागर करण्यांत आला.

या महिन्यांत श्रीपुढें सौ. हिराबाई बडोदेकर (गायन), श्री. गजाननराव जोशी (फिडल वादन), लोकशाहीर नानिवडेकर, कोल्हापूर (पोवाडे) व इतर बऱ्याच कलाकार भक्तांनीं आपापल्या कलेची हजेरी दिली.

मुंबई सरकारचे महसूल-मंत्री आमदार श्री. भाऊसाहेब हिरे हे अहमदनगर जिल्हा कॉंग्रेस अध्यक्ष स्वामी सहजानंदभारती व मुंबई सरकारचे माजी मंत्री श्री. ल. म. पाटील यांचे समवेत श्रींचे दर्शनास आले होते. तसेंच पुण्याचे सरदार आबासाहेब मुजुमदार हेही याच महिन्यांत श्रींचे दर्शनास येऊन गेले.

श्रीसाईबाबा संस्थान धर्मार्थ दवाखान्याचा (होमिओपॅथी) फायदा या महिन्यांत
सुमारें १४०० रोग्यांनीं घेतला. खास दवाखान्यासाठीं कांहीं भक्तांनीं देणग्या दिल्या. श्री.
रतिलाल शहा, अहमदाबाद, यांनीं १०० रुपयांची देणगी दवाखान्यासाठीं दिली.

शिरडी संस्थान व्यवस्थापक समितीची या वर्षातील पहिलीच सभा शिरडी येथें ता. २५-१-५३ रोजीं भरली होती. संस्थानचे व्यवस्थापक, विश्वस्त, सन्मानीय चिटणीस, सन्माननीय खजिनदार व इतर बरेच मुंबईचे सभासद व स्थानिक सभासद सभेस हजर होते.

ी

# श्रीसाईबाबा संस्थान व्यवस्थापक मंडळ

## विश्वस्त

१ श्री. नागेशराव आत्माराम सावंत ( कार्यकारी विश्वस्त )
२ ,, बाजीराव तात्याबा कोते पाटील
३ ,, दत्तात्रय दामोदर रासने
४ ,, श्रीपाद बाळकृष्ण देव B. A. ( HONS ), L L. B., ADVOCATE
५ ,, परशराम कृष्णाजी सावंत B. A. L L. B., M. L. A.

## व्यवस्थापक मंडळाचे सभासद

१ श्री. रामचंद्र दादा कोते पाटील ( अध्यक्ष )
२ ,, दत्तात्रय बळवंतराव राणे ( सं. चिटणीस )
३ ,, हरिभाऊ त्रिंबकराव शेळके पाटील ( दु. चिटणीस )
४ ,, विनायक शामराव कीर्तीकर ( सं. खजिनदार )
५ ,, रामचंद्र महादेवराव राणे ( दु. खजिनदार )
६ डॉ. केशव भगवन्त गव्हाणकर, L. C. P. S., सभासद.
७ डॉ. भोलानाथ सुंदरराव नवलकर M. SC. Ph. D. ,,
८ श्री. सुमन्त मोरेश्वर प्रधान ,,
९ ,, सीताराम गोविंद वालावलकर, B. A. ( HONS ) ,,
१० ,, बाळकृष्ण सखाराम पाताडे ,,

दादर भागांत
फॅशनेबल व टिकाऊ
शिलाईचे कपडे व्यवस्थित
व किफायतशीर दरानें शिवून मिळण्याचें
: प्रख्यात ठिकाण :

## — रावल टेलरिंग फर्म —

मोहमद बिल्डिंग चित्रा सिनेमा जवळ, व्हिन्सेन्ट रोड, दादर मुं. १४

## RAWAL TAILORING FIRM

TAILORS & OUTFITTERS
Mohamad Building (Near Chitra Cinema)
Vincent Road, Dadar, Bombay 14.
A TRIAL ORDER WILL SATISFY YOU
ROR BEST STYLES
AT MODERATE RATES
MADE WELL
WEAR WELL

मोहक, भरजरी, रेशमी, सुती व विविध तऱ्हेचा
पक्क्या रंगाचा स्त्रिया, पुरुष व मुलें यांना
नेहमीं व लग्नप्रसंगी लागणारा कापड
माल किफायतदरानें खात्रीपूर्वक
मिळण्याचें दुकान

# शिवाजी क्लॉथ स्टोअर्स

ठिकाणा : मेथा मॅन्शन, लालबाग, मुंबई १२